आनंद सागर मंगल कार्यालय
शाकाहारी करिता
एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.
* लग्न सोहळा * साखरपुडा * रिसेप्शन * वाढदिवस
* गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम
आकाश वापसा चौरसा, गोल्फ, जकाल, देखणुख गेट पंपाजवळ कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वामी मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719

गोदातीर समाचार
स्थापना-१९६२ गोदातीर ६४ वर्ष
RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

जोशी बंधू यांचे ..!!
शंकर भट्ट मंगल कार्यालय

मंगल कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली आपल्या सेवेत..!!
(लग्न, साखरपुडा, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, बारसे, डोहाळ जेवण, स्वागत समारोह व ईतर...)
पत्ता : भगवान परशुराम चौक किंनवट रोड भोकर मो. क्र. 9765983335/9960659975/9881881934/9527889927

* वर्ष ६४ वे * अंक ८२ * नांदेड * शुक्रवार, दि. २८ मार्च २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

नाशिकच्या त्र्यंबकेश्वर देवस्थानला तीर्थक्षेत्राचा 'अ' वर्ग दर्जा जाहीर; कुंभमेळ्यापूर्वी निर्णय

नाशिक (प्रतिनिधी)– प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यानंतर आगामी सिंहस्थ कुंभमेळाची तयारी जोरदारपणे सुरू असून महायुती सरकारने याबाबत जबाबदारी निश्चित करायला सुरुवात केली आहे. नाशिकमध्ये यंदाचा सिंहस्थ कंभुमेळा होत असून तत्पूर्वीच नाशिककर आणि भाविकांसाठी आनंदाची बातमी समोरा आली आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर देवस्थानला तिर्थक्षेत्राचा 'अ' दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे, येथील देवस्थानाच्या विकास आराखड्याला गती मिळणार असून भाविकांना देखील मोठ्या सोयी-सुविधा उपलब्ध होतील.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्याच आठवड्यात नाशिक त्र्यंबकेश्वरला जाऊन महादेवाचे दर्शन घेतले होते. यावेळी, येथील तिर्थक्षेत्राची पाहणी करुन त्यांनी प्रशासनाला काही महत्त्वाच्या सूचनाही केल्या होत्या. आता, त्र्यंबकेश्वर मंदिराला अ वर्ग दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे, भाविकांमध्ये समाधानाचं



वातावरण आहे. त्र्यंबकेश्वर येथे वर्षाला कोट्यवधी भाविक येत असतात. म्हणूनच पंढरपूरप्रमाणे नाशिक आणि त्र्यंबकला देखील शासनाच्या तीर्थक्षेत्र यादीत अ वर्ग दर्जा मिळाल्यास भाविकांना उत्तम दर्जाच्या सुविधा मिळवून देता येतील, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून केली जात होती. अखेर कुंभमेळ्यापूर्वी शासनाने हा निर्णय घेतला आहे.

नाशिकच्या त्र्यंबकेश्वर मंदिराला तीर्थक्षेत्र 'अ' दर्जा देण्यास नगर विकास खात्याने मंजुरी दिली आहे. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक तीर्थस्थान, निवृत्तीनाथ महाराज समाधी स्थळ, महाशिवरात्री, श्रावण महिन्यातील ब्रह्मगिरी प्रदक्षिणा आशा वेगवेगळ्या कारणाने वर्षभर येथे भाविकांची वर्दळ असते. त्यामुळे, तिर्थक्षेत्र अ दर्जा देण्याची मागणीही सातत्याने केली जात होती. विभागीय आयुक्तांकडून जानेवारी महिन्यात यासंदर्भात प्रस्ताव पाठवण्यात आला होता. अखेर, या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली असून आगामी सिंहस्थ कुंभ मेळ्याच्या पार्श्वभूमीवर विशेष दर्जाचा भाविकांना व मंदिर प्रशासनाला फायदा होणार आहे.

दरम्यान, याअगोदर ३ वर्षांपूर्वी ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत नाशिक जिल्ह्यातील ६ तिर्थक्षेत्रांना ब वर्ग दर्जा देण्यात आला आहे. त्यामध्ये, येवला तालुक्यातील कोटमगावचे जगदंबा देवस्थान, सिन्नर तालुक्यातील नांदूरशिंगोटे येथील रेणुका माता मंदिर, देवळा तालुक्यातील रामेश्वर मंदिर, निफाड तालुक्यातील श्री खंडेराव महाराज मंदिर आणि सुकेणे येथील श्री दत्त मंदिर व पिंपळगाव बसवंत येथील श्री राम मंदिर या देवस्थानचा ब वर्ग दर्जामध्ये समावेश करण्यात आला होता.

मंत्री गिरीश महाजन डोक्याला मार लागल्याने जखमी

नाशिक (प्रतिनिधी)– देशसेवा बजावत असताना वीरमरण आलेल्या वरणगाव येथील अर्जुन बाविस्कर यांच्या पार्थिवाचे दर्शन घेताना मंत्री गिरीश महाजन यांच्या डोक्याला लोखंडी रॉड लागल्याने दुखापत झाली आहे. या दुखापतीनंतर जखमी अवस्थेतच मंत्र्यांना वरणगाव येथील निमजाय हॉस्पिटल येथे नेण्यात आले, तेथे त्यांनी प्राथमिक उपचार घेतल्यानंतर ते वीर जवान अर्जुन बाविस्कर यांच्या अंत्ययात्रेत सहभागी झाले होते. त्यानंतर, महत्त्वाची बैठक असल्याने ते पुढे नाशिककडे रवाना झाले आहेत. दरम्यान, मंत्री महोदयांच्या डोक्याला इजा झाल्याने त्यांच्या कार्यकर्त्यांची काहीवेळ धांदल उडाली होती.

वरणगाव येथील वीरगती प्राप्त झालेले जवान अर्जुन लक्ष्मण बाविस्कर यांना मानवंदना देण्यासाठी जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन गुरूवारी वरणगाव शहरात आले होते. यावेळी ही घटना घडली.

दक्षिण कोरियामध्ये वणव्याचा भडका! २७ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– दक्षिण कोरियामध्ये आजवरच्या इतिहासातील सर्वात मोठा वणवा पेटला असून आग आटोक्यात आणण्यासाठी युद्ध स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. आपत्कालीन परिस्थितीत मदत करणाऱ्या यंत्रणांकडून लोकांना आणि ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या प्राचीन कलाकृतींना वाचवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. यादरम्यान या आगीत आत्तापर्यंत किमान २७ जणांचा मृत्यू झाला आहे. या वणव्याचे अनेक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

रौद्र रुप घेतलेल्या आगीत ऐतिहासिक मंदिरे देखील जळून भस्म होतआहेत. Cheondeungsan डोंगरावरील आगीत Unramsa हे हजार वर्ष जुने बौद्ध मंदिर जळून खाक झाले आहे.

देशातील सर्वात भीषण वणवा आटोक्यात आणण्यासाठी यंत्रणा काम करत असल्याचे व्हिडीओ समोर आले आहेत. या व्हिडीओ मध्ये अग्निशमन दलाचे जवान

जंगलात धावपळ करताना दिसून येत आहेत. तर आगीच्या प्रचंड ज्वाळा आणि धुराचे लोट परिसरात पसरल्याचे पाहायला मिळत आहे.

रॉयटर्सच्या एका रिपोर्टनुसार, मध्य Uiseong काउंटीमध्ये सुरू झालेल्या वणव्यांमुळे ३३,००० हेक्टर (८१,५०० एकर) पेक्षा जास्त आकाराचा परिसर जळून खाक झाला आहे. यासह ही आगीची आजवरची सर्वात मोठी घटना ठरली आहे. यापूर्वी मार्च २००० मध्ये लागलेल्या आगीत २४,००० हेक्टर्स (५९,००० एकर्स) भाग जळून खाक झाला होता.

दक्षिण कोरियात आग लागलेला भाग हा डोंगराळ भाग आहे, त्यामुळे वणवा नियंत्रणात आणण्यासाठी हेलिकॉप्टर्सचा वापर करावा लागत आहे आणि सरकारने दिलेल्या माहितीनुसार १२०हून अधिक हेलिकॉप्टर्स तीन भागात तैनात करण्यात आले आहेत. आगीचा सामना करताना एका दुर्घटनेत एका हेलिकॉप्टर पायलटचा मृत्यू झाल्याची घटना देखील घडली. प्रशासनाने वणव्यात मृत्युमुखी पडलेल्यांची माहिती उघड केलेली नाही, परंतु बहुतेक जण ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे होते. वणव्यातून लवकर बाहेर पडणे शक्य न झाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

पाणी फाऊंडेशनचं तुफान महाराष्ट्रभर पुन्हा येणार; आमिर खानची घोषणा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते शुभारंभ

मुंबई (प्रतिनिधी)– आम्ही आता पाणी फाउंडेशनचे काम राज्यभर करणार आहोत. पुढच्या वर्षीपासून आम्ही पूर्ण महाराष्ट्रात हे काम करूअशी घोषणा अभिनेता आमिर खाननं केली आहे. काही मोजक्या गावांमध्ये नाही तर आता राज्यभरातील अनेक गावांमध्ये पाणी फाऊंडेशनचं तुफान पुन्हा येणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नव्या उपक्रमाचा शुभारंभ पुण्यात करण्यात आला.

३ वर्षांपूर्वी एक स्वप्न घेऊन आम्ही पुढे आलो होतो. ते स्वप्न शेतकऱ्यांसाठी होतं. शेतकऱ्यांसाठी काय करू शकतो, पीक कसे वाढवता येईल हे सगळे मुद्दे घेऊन समोर आलो होता. देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून आभार मानतो की ते आमच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले म्हणून दरवर्षी आम्ही यशस्वी होत गेलो. असेही ते म्हणाले.

देवेंद्रजी प्रत्येक वर्षी तुम्ही मला एक गोष्ट विचारत की हे काम घेऊन संपूर्ण महाराष्ट्रात तुम्ही कधी जाणार आहात? पण आम्हाला थोडी भीती वाटते कारण ही जिम्मेदारी खूप मोठी आहे आपला महाराष्ट्र जर्मनी पेक्षा खूप मोठा आहे म्हणून भीती वाटते की राज्यभर आपण पाणी फाउंडेशनच काम घेऊन जाऊ शकतो का? आम्ही आता पाणी फाउंडेशनचे काम राज्यभर करणार आहोत.पुढच्या वर्षीपासून आम्ही पूर्ण महाराष्ट्रात हे काम करू.पाणी फाउंडेशनचे काम आता संपूर्ण महाराष्ट्रात करणार असल्याचे अभिनेता आमिर खान म्हणाला.

कृषी खात्यात सुमारे सहा कोटींचा अपहार; नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

नांदेड (प्रतिनिधी)– धनेगाव येथील कृषी जिल्हा अधीक्षक कार्यालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या एकाने मुखेड, कंधार, बिलोली, नायगाव तालुक्यातील कृषी कार्यालय व वितरकांना जिल्ह्यातील सूक्ष्म सिंचन योजने अंतर्गत काहींना सोबत घेऊन ५ कोटी ९८ लाख रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार १ जानेवारी २०२१ ते

३१ डिसेंबर २०२३ च्या दरम्यान घडला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कृषी कार्यालयाअंतर्गत तत्कालीन कृषी पर्यवेक्षक व त्यांच्या इतर साथीदारांनी १ जानेवारी २०२१ ते ३१ डिसेंबर २०२३ च्या दरम्यान मुखेड, कंधार, बिलोली, नायगाव तालुक्यातील काही कृषी कार्यालय व वितरकांच्या दुकानात जाऊन जिल्ह्यातील सूक्ष्म सिंचन योजना सन २०२१, २०२२, २०२३ मध्ये वितरित करण्यासाठी ठिबक व तुषार संचाची मार्गदर्शक सूचनेनुसार तपासणी न करता तत्कालीन कृषी पर्यवेक्षक आर. जे. मरदोडे आणि त्यांच्या इतर साथीदारांनी संगणमत करून खोटे दस्तावेज तयार करून ते खरे आहे, असे भासवून या योजनेअंतर्गत ५ कोटी ९८ लाख रुपये उचलून शासनाची व कृषी कार्यालयाची फसवणूक करून वरील रकमेचा अपहार केला. याप्रकरणी तंत्र अधिकारी जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालय येथील एस. एस. स्वामी यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर करत आहेत.

राज्यात पुढील ४८ तासांत पावसाची शक्यता

मुंबई (प्रतिनिधी)– पश्चिम विक्षोभ आणि स्थानिक वातावरणातील बदलांमुळे राज्यात हे बदल दिसतील. विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर आणि मराठवाड्यातील परभणी, बीड, जालना यांसारख्या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता जास्त आहे. मध्य महाराष्ट्रात पुणे, सातारा आणि सांगलीमध्येही तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडू शकतो. दरम्यान, मुंबई, ठाणे आणि पालघरसारख्या भागात आकाश अंशतः ढगाळ राहील, परंतु पाऊस पडण्याची शक्यता कमी आहे.

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत अहिल्यानगरला पहिले सुवर्णपदक

कर्जत (प्रतिनिधी)– ६६ वी महाराष्ट्र केसरी व राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेमध्ये पहिले सुवर्णपदक अहिल्यानगर जिल्ह्याने पटकावले. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने कर्जत येथे महाराष्ट्र केसरी व राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा होत आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी ५७ किलो वजनी गटामध्ये गादी विभागात अहिल्यानगर जिल्ह्याने पहिले सुवर्णपदक पटकावले. कर्जत तालुक्यातील कोरेगाव येथील सचिन मुरकुटे याने मुंबई शहरचा सचिन चौगुले यास एक चाकी डाव टाकत चिटपट केले.

तीव्र उष्णतेच्या लाटांमुळे केंद्र सरकार अलर्टमोडवर, सर्व राज्यांना पत्र

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– देशभरात एकीकडे वाढता उष्मा चिंतेचं कारण ठरत आहे. हवामान विभागाने यंदाचा उन्हाळा अधिक असेल असा अलर्ट दिल्यानंतर देशभर तीव्र उष्णतेचे इशारे देण्यात येत आहेत. आता देशासह राज्यभरात तापमान झपाट्यानं वाढू लागलंय. दरम्यान, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर आता केंद्र सरकारही अलर्ट मोडवर आले आहे. केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाने या संदर्भात राज्यांना पत्र लिहून सतर्क केले आहे. वाढत्या तापमानामुळे लोक उष्माघाताला बळी पडू शकतात. त्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या परिणामांना रोखण्यासाठी देखरेख करण्यासाठी आरोग्य सुविधांची प्रभावी तयारी करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात मार्गदर्शक कागदपत्रे सर्व जिल्ह्यांना प्रसारित करण्याची विनंतीही करण्यात आली आहे.

उष्णतेच्या लाटेसंबंधित आरोग्यविषयक परिणाम टाळण्यासाठी आणि परिस्थिती हाताळण्यासाठी मार्गदर्शक सूचना जिल्हा स्तरावर पोहोचवाव्यात. तसेच, राष्ट्रीय हवामान बदल आणि मानव आरोग्य कार्यक्रमाअंतर्गत वर्च्युअल ट्रेनिंग सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे, जे आरोग्य तज्ज्ञांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी राज्यांनी घ्यावी. असे केंद्र सरकारने राज्यांना निर्देश देण्यात आले आहेत.

लखनौचा हैदराबादवर दणदणीत विजय

हैदराबाद (प्रतिनिधी)– लखनौ सुपर जायंट्स संघाने वादळी फलंदाजीसाठी ओळखल्या जाणाऱ्या हैदराबादविरूद्ध विस्फोटक फलंदाजी करत ५ विकेट्सने विजय मिळवला. लखनौच्या संपूर्ण संघाने उत्कृष्ट कामगिरी करत हैदराबादला सामन्यात कायमच बॅकफूटवर ठेवलं. गोलंदाजांनी हैदराबादच्या फलंदाजांवर आळा घातला. तर निकोलस पूरन आणि मिचेल मार्शने हैदराबादच्या गोलंदाजांची धुलाई करत गतवर्षीच्या पराभवाचा व्याजासकट बदला घेतला आहे.

नांदेड : राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना आ. चिखलीकर यांच्या साई सुभाष संपर्क कार्यालयात नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर, माजी आ. मोहनराव हंबर्डे, माजी आ. अविनाश घाटे यांच्यासह नवनियुक्त पदाधिकारी, कार्यकर्ते दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन येणार भारत दौऱ्यावर, मोदींचं निमंत्रण स्वीकारलं!

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन लवकरच भारत भेटीवर येणार आहेत. गेल्यावर मॉस्को दौऱ्यावर असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना भेटीचं आमंत्रण दिलं होतं. २०२२ पासून रशियाचे युक्रेनबरोबर युद्ध सुरू आहे. या युद्धच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे व्लादीमीर पुतिन यांच्या सातत्याने संपर्कात होते, त्यामुळे त्यांच्यात जवळचे संबंध निर्माण झाले आहे. दरम्यान, पुतिन यांचा हा पहिलाच दौरा असणार आहे.

रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी सांगितले की, पुतिन यांच्या भारतभेटीच्या तारखा निश्चित झाल्या नसल्या तरीही त्यांच्या भारत भेटीची तयारी सुरू आहे. राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी भारतीय सरकार प्रमुखांकडून भेटीचे निमंत्रण स्वीकारले आहे, लावरोव्ह म्हणाले. तिसऱ्यांदा निवडून आल्यानंतर पंतप्रधान मोदींनी त्यांच्या पहिल्या परदेश दौऱ्यासाठी रशियाची निवड केली होती. हे लक्षात घेऊन लावरोव्ह म्हणाले, आता आपली पाळी आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर युक्रेन युद्ध तसेच भू-राजकीय उलथापालथीवर दोन्ही नेते चर्चा करतील अशी अपेक्षा आहे. युक्रेन संघर्षावर भारताने तटस्थ भूमिका कायम ठेवली आहे, जरी पंतप्रधान मोदींनी पुतिन यांना वारंवार सांगितले आहे की, हा युद्धाचा काळ नाही. संयुक्त राष्ट्रांनी रशियाचा निषेध करणाऱ्या ठरावांनाही भारताने अनुपस्थित राहून पुतिन यांची सार्वजनिक टीका करण्याचे टाळले आहे.

रेल्वे स्टेशनवर कन्फर्म तिकीटवाल्यांनाच एंट्री, गर्दी टाळण्यासाठी नवी यंत्रणा; रेल्वेमंत्र्यांची संसदेत माहिती

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– रेल्वे स्टेशन म्हणजे गर्दीचं ठिकाण हे सांगायला कुठल्या ज्योतिषाची गरज नाही. त्यातच, महानगर, मेट्रो सिटीतील रेल्वे स्थानकांवर जत्रा, यात्रा, उन्हाळी सुट्टी, दिवाळी सुट्टी आणि इतर सुट्टीच्या हंगामात मोठी गर्दी असते. अनेकदा रेल्वे स्थानकावरील ही गर्दी चेंगराचेंगरीचे कारणही बनते. रेल्वे स्थानकावरील या गर्दीला आटोक्यात आणण्यासाठी रेल्वे प्रशासनाने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये, मोठ्या आकाराचे फुटवेअर ब्रीज, सीसीटीव्ही आणि वॉर रुम यांसारख्या व्यवस्था करण्यात आल्या आहेत. तर, देशातील ६० रेल्वे स्थानकांवर केवळ कन्फर्म तिकीट असलेल्यांनाच प्रवेश देण्यात येणार आहे. वेटिंग लिस्ट आणि विनातिकीट प्रवाशांना स्टेशनच्या बाहेरच प्रतिक्षा रुममध्ये थांबावे लागणार आहे, अशी माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

रेल्वे स्थानकावरील गर्दी नियंत्रित करण्यासी रेल्वेनं मर्यादीत प्रवेश नियंत्रण प्रणाली सुरू केली

आहे. या प्रणालीनुसार स्टेशनच्याबाहेर होल्डिंग म्हणजेच वेटिग रुम सुरू करण्यात येईल. त्यामध्ये, ट्रेन प्लॅटफॉर्मवर येईपर्यंत प्रवाशांना बसवून ठेवण्यात येणार आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी संसदेत दिलेल्या माहितीनुसार, २०२४ च्या सणासुदीच्या काळात सूरत, उधणा, पाटणा आणि नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर असे होल्डींग एरिया तयार करण्यात आले आहेत. महाकुंभच्या दरम्यान प्रयागराजमधील ९ स्थानकांवर देखील ही व्यवस्था उभारण्यात आली होती. या अनुभवाच्या आधारे देशभरातील ६० रेल्वे स्थानकांवर कायम स्वरुपीचा वेटींग एरिया असणार आहे.

देशातील ६० रेल्वे स्थानकांवर पूर्ण प्रवेश नियंत्रण लागू करण्यात येईल. त्यामुळे, केवळ कन्फर्म रिझर्व्हेशन तिकीट असणाऱ्यांनाच येथे प्रवेश दिला जाईल. वेटिंग लीस्ट आणि बिनतिकीट प्रवाशांना बाहेरील प्रतिक्षा क्षेत्र म्हणजेच होल्डिंग एरियातच वाट पाहावी लागेल. अनाधिकृत प्रवेशद्वारांना देखील बंद केला जाईल, असे रेल्वेमंत्र्यांनी सभागृहात सांगितले.

रेल्वे स्टेशनवरील प्रवाशांची सुरक्षा वाढविण्यासाठी, रात्रीच्या वेळेसही प्रवाशांना सुरक्षा मिळावी, त्यांना भीती वाटू नये म्हणून रेल्वे स्थानकांवर सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. नव्या डिझाईनचे १२ मीटर आणि ६ मीटर लांब एफबीओ बनविण्यात येत आहेत. गर्दी नियंत्रित करण्यासाठी त्यांची मदत होणार आहे. तसेच, सर्वच प्रमुख रेल्वे स्थानकांवरील सीसीटीव्हींच्या संख्येत वाढ केली जाईल, अशीही माहिती रेल्वेमंत्र्यांनी दिली.

बॅनरवरून मोटारसायकल नेल्याने एकास जबर मारहाण

पाच आरोपींच्या आवळल्या मुसक्या

नायगाव बाजार (प्रतिनिधी)– नायगाव तालुक्यातील नरसी येथे लग्नाचे बॅनरवरून मोटारसायकल का नेली असा जाब विचारणाऱ्या युवकास मुस्लिम युवकांनी जबर मारहाण केल्याची घटना नरसी येथे घडली आहे. मारहाणीत अर्जुन मेटकर याला गंभीर दुखापत झाली आहे. या घटनेतील सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

नरसी ता. नायगाव येथील मेटकर कुटुंबात दि.२६ मार्च रोजी एक लग्न होते. यानिमित्त येथील चौकाजवळच असलेल्या बजरंगनगर भागातील कॅनॉल रोडवर त्या लग्नाचे बॅनर मेटकर कुटुंबाच्यावतीने लावले जात होते. अर्जुन मेटकर हा सदर बॅनर जमिनीवर ठेवून फिटिंग करत असतानाच तेथून सुसाट जाणाऱ्या युवकांनी त्या बॅनरवरून मोटारसायकल घातली. अर्जुनने याबाबत त्यांना जाब विचारला. त्यांच्यात यावेळी शाब्दिक बाचाबाची झाली. नंतर विषय थांबला, पण रात्री उशिरा त्या युवकांनी पुन्हा इतर काही युवकांना सोबत घेवून अर्जुन मेटकर याला नरसीच्या मुख्य चौकात गाठले. त्याठिकाणी अर्जुन यास रक्तबंबाळ होईपर्यंत लाठ्या-काठ्यांनी मारहाण केली. या जबर मारहाणीत अर्जुन मेटकर याच्या चेहऱ्यावर व डोळ्याला गंभीर जखम होवून नाकाचे हाड तुटले. गंभीर अवस्थेत जखमी अर्जुन मेटकर यास उपचारासाठी नांदेड येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत रामतीर्थचे (पान ६ वर...)

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

राजकीय मानापमान

भारतात २०२५ वर्षाच्या पहिल्या तिमाहीतच विनोदवीर आणि राजकीय व्यंग यासंबंधित मोठे वाद उफाळून आले आहेत. रणवीर अलाहाबादियाच्या वादळानंतर आता स्टँड-अप कॉमेडियन कुणाल कामराच्या नव्या 'नया भारत' या शोमुळे नवीन वाद निर्माण झाला आहे. भारतात नेते एकमेकांवर टीका करण्यास अजिबात मागे हटत नाहीत, पण स्टँड-अप कॉमेडियनला मात्र त्याच स्वातंत्र्याची संधी दिली जात नाही. कामराने मुंबईतील एका शोमध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अप्रत्यक्ष उल्लेख करत त्यांच्यासाठी अपमानजनक शब्द वापरला. यामुळे शिवसेना (शिंदे गट) समर्थक संतप्त झाले आणि त्यांनी केवळ शो शुट झालेल्या हॅबिटॅट स्टुडिओवरच नाही, तर त्या स्टुडिओला सामावून घेतलेल्या हॉटेलवरही हल्ला चढवला. कामरावर बदनामीचे आरोप ठेवत पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कामराने माफी मागावी, अशी मागणी केली आहे. इतकेच नव्हे, तर सत्ताधारी पक्षाचे काही कट्टर समर्थक त्याला देश सोडून जावे लागेल, अशी धमकीही देत आहेत. या संपूर्ण प्रकरणावरून अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मर्यादा आणि त्याची व्याख्या काय असावी, यावर वादंग माजला आहे. कामराने काहीशी मर्यादा ओलांडली का? तसा विचार केला, तर त्याने यापूर्वी पंतप्रधान आणि भारताचे सरन्यायाधीश यांच्यावरही टीका केली होती. शिवाय, एकनाथ शिंदे यांच्यावर केलेली टिप्पणीही काही नवीन नव्हती. काही आठवड्यांपूर्वीच शिवसेनेचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शिंदे यांच्यावर टीका केली आहे. त्याला प्रत्युत्तर देताना शिंदे यांनी, मी कुंभमेळ्यात महाराष्ट्रद्रोह्यांचे पाप धुण्यासाठी गेलो होतो, असे उत्तर दिले होते. दोघांमध्ये २०२२ पासून शाब्दिक युद्ध सुरू आहे, पण त्यांनी एकमेकांवर कायदेशीर कारवाई करण्याचा प्रयत्न केलेला नाही. या संपूर्ण प्रकरणात सर्वात चिंतेची बाब म्हणजे कामराच्या शोवर झालेला हिंसक हल्ला. यावरून हे स्पष्ट होते की, महाराष्ट्रासह संपूर्ण देशात राजकीय व्यंगासाठीची जागा कमी होत आहे. सत्ताधाऱ्यांवर टीका करणे किंवा त्यांचे चुकलेले निर्णय हसत-हसत मांडणे हे लोकशाहीत सहन केले जाणे अपेक्षित असते. मात्र, आता अशा प्रकारच्या घटनांमुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर अघोषित निर्बंध येऊ लागले आहेत. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला बोलण्याचे स्वातंत्र्य दिले आहे, पण त्यावर काही 'तर्कसंगत बंधने' आहेत. पण याचं तारतम्य टीकाकारांना नाही असे दिसून येत आहे. स्वातंत्र्याचा अर्थ स्वाहाकार असाच केला जातो आहे. यामुळे जवाहरलाल नेहरू विद्यापीठ आणि अन्य विद्यापीठातील राजकीय बाहुली असलेले विद्यार्थी अशाच प्रकारची निकृष्ट दर्जाची टीका करतात ते आपण सहन करतो. आजकाल कोणत्याही टीकेला 'राष्ट्रविरोधी', 'संस्कृतीविरोधी' किंवा 'बदनामीकारक' म्हणून चिरडून टाकले जात आहे. याचे गंभीर परिणाम समाजावर आणि लोकशाही व्यवस्थेवर होत आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये अनेक विनोदवीरांना त्यांच्या टीकेसाठी लक्ष्य करण्यात आले आहे. याचा परिणाम असा होतो की, केवळ कॉमेडी नव्हे तर चित्रपट, नाट्य, साहित्य अशा सर्व प्रकारच्या कलांवर दडपण येऊ शकते. असे असले तरी कलाकारांनी आपल्या स्वातंत्र्याचा उपयोग करताना इतरांचा अपमान होणार नाही एवढी बुद्धी बाळगली पाहिजे. कारण सत्ताधाऱ्यांची टीका सहन करण्याची मर्यादा असते. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अलीकडेच म्हटले की, अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे कुणाच्याही जन्मसिद्ध हक्कात नाही. हा दृष्टिकोन पाहता सत्ताधाऱ्यांकडून टीका सहन करण्याची मानसिकता कमी होत चालली आहे. वास्तविक पाहता, नेत्यांना टीका सहन करावी लागते, हे लोकशाहीतील एक महत्त्वाचे तत्त्व आहे. पण ही टीका संबंधित नेता आणि त्याच्या राजकीय पक्षाच्या ध्येयधोरणावर असावी. त्यांचे निर्णय चुकल्यास त्यावर टीका करणे वावगे नाही, परंतु वैयक्तिक पातळीवर जाऊन व्यक्ती कसा दिसतो आणि कसा वाटतो यावर टीका करणे हे मानवतेला आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला धरून नाही. पण सध्याच्या परिस्थितीत, असे होत नाही. टीकाकार खालच्या पातळीवर जाऊन टीका करतात. यामुळेच अशा टीकाकारांवर गुन्हे दाखल होतात किंवा त्यांना मानसिक त्रास दिला जातो. जर भारतीय लोकशाही टिकवायची असेल, तर मतभिन्नता सहन करण्याची आणि चर्चेसाठी जागा ठेवण्याची गरज आहे. कुणाल कामरासारख्या कलाकारांनी मांडलेली टीका ही केवळ त्यांचा वैयक्तिक दृष्टिकोन असतो, तो संपूर्ण समाजाचा विचार असतोच असे नाही. अशा शाब्दिक टीकेला शाब्दिक प्रकारे उत्तर देणे किंवा कोर्टाच्या मदतीने कार्यवाही करणे गरजेचे आहे. अशा ठिकाणी हल्ले करणे हे मात्र समर्थनीय नाही. भारतात यापूर्वी अनेक वेळा व्यंगचित्रकार, नाटककार आणि लेखकांवर हल्ले झाले आहेत. ही केवळ कुणाल कामराची गोष्ट नाही, तर हे एक मोठे चित्र आहे, जिथे स्वातंत्र्य कमी होत चालले आहे. जर अशी स्थिती राहिली, तर भविष्यात कलाकार आणि लेखक उघडपणे काहीही म्हणण्यास घाबरतील, आणि जर टीका, विनोद आणि मतभिन्नता यासाठी जागाच राहिली नाही तर ती एक निरोगी लोकशाही राहणार नाही.

माणूस पैशानं नाही, कर्मानं मोठा!

स्वतःला असे मजबूत बनवा की लोकं तुमचा आदर्श घेतील. होय, हे म्हणणं खरंच आहे त्याची पुनरावृत्ती नेते करतातच. जुने आणि आजचेही फरक एवढाच आहे की कालचे नेते हे सेवेच्या दृष्टीकोनातून स्वतःला मजबूत बनवायचे. आजचे नेते स्वतःच्या स्वार्थासाठी भ्रष्टाचार करुन स्वतःला मजबूत बनवतात.

मजबूत बनवणे. आजचा काळ असाच आहे. आज सर्वच लोकं स्वतःला मजबूत बनविण्यासाठी रात्रंदिवस मेहनत करीत असतात. ते स्वतःला मजबूत बनवीत असतांना दुसऱ्याचा विचारच करीत नाहीत. दुसरा मरत असेल तरी त्यांना त्यांच्यात काही घेणं देणं नसतंच. अशातच त्यांना आवडत असतं दुसऱ्याला त्रास देणं. आजचे लोकं दुसऱ्याचे रक्त पिवूनच स्वतः मजबूत बनत असतात. उदाहरण द्यायचं झाल्यास एखाद्या कारखान्याचं देता येईल. कारखान्यातील मालक हा काही काम करीत नाही. तो फक्त आदेशच द्यायचे काम करतो. त्याची सर्व कामे ही मॅनेजर करीत असतो. तरीही तो सक्षम असतो. त्याचं कारण आहे, त्याच्याजवळ येणारा पैसा. तो पैसा त्याच्या मेहनतीनं येत नाही. तो पैसा येतो, त्यांच्या कारखान्यात काम करणाऱ्या कामगार वर्गामुळं. तो कामगार वर्ग दिवसरात्र काम करतो आणि त्या काम ाचा मोबदलाही त्याला तेवढ्या प्रमाणात मिळत नाही. जो पैसा मालकाच्या खिशात जातो. ज्यातून मालक हा अधिकाधिक सक्षम होत जातो. दुसरं उदाहरण शाळे-तील संस्थाचालकाचं देता येईल. तो जास्त काम करीत नाही फक्त संस्था रजीस्टर करतो. त्यानंतर तो एखादी लहानशी जागा घेतो. त्या जागेवर एक लहानशी इमारत बांधतो. त्या जागेवर शाळा उभारतो. ती शाळा उभारली की त्या ठिकाणी कर्मचारी नियुक्त करतो. वेळप्रसंगी कर्मचारी नियुक्त करतांना त्यांचेकडून पैसा घेतो. शिवाय विद्यार्थ्यांकडूनही शुल्क गोळा करतो. ज्यातून ती शाळा वाढते. त्याचबरोबर संस्थाचालक. तो पैशानंही वाढतो आणि त्यातल्यात्यात अहंकारानंही. याबाबतीत तिसरं आणखी एक उदाहरण आहे. ते म्हणजे एखाद्या अधिकाऱ्यानं भ्रष्टाचार करुन कमविलेल पैसा. तोही भ्रष्टाचार करुन पैसा कमवीत असतो. कालपरवाच्या वर्तमानपत्रातून न्यायाधीश व वकीलांनी पैसा कमवला असं दिसलं.

स्वतःला मजबूत बनविण्यासाठी सर्वात महत्वाची वस्तू आहे पैसा. पैसा जर नसेल तर त्या व्यक्तीला कोणी मोजत नाही वा त्याची इज्जतही कोणी करतांना दिसत नाही. म्हणतात की पैशानं सारं काही विकत घेता येतं. शिक्षण सुद्धा पैशानं विकत घेता येतं. अलिकडील काळात डॉक्टर, इंजीनियर हे पैशाच्या जोरावरच बनत असलेले दिसतात. नेते मंडळीही पैसा खर्च करुन नेतेगिरी प्राप्त करीत असतात. पैसा नसेल तर निवडणूकही लढता येत नाही. दुसरी महत्वाची वस्तू आहे शिक्षण. जी मंडळी जास्त शिकतात. तेही सक्षमच असतात. त्यांच्याजवळ पैसा नसला तरी समाज त्यांना विचारत असतो. जसं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर. त्यांच्याकडे पैसा नव्हता. परंतु त्यांनी शिक्षण घेतलं. ते एवढं शिक्षण घेतलं की त्या शिक्षणाच्या भरवशावर ते समोर गेलेत. आजही त्यांचं नाव आहे.

पुर्वीच्या काळी राजपद्धती होती. त्या पद्धतीत जो राजा राजगादीवर बसत असे. साहजीकच तो सक्षम असे व त्याचा प्रजेत दरारा निर्माण होत असे. तसा दरारा तो राजा निर्माण करीत असे. जसं शिवाजी महाराजांनी केलं. एकेक किल्ले घेत त्यांनी अफजलखानाला मारले. ज्यातून शिवाजी महाराजांची भीती पंचक्रोशीत पसरली. दुसरं उदाहरण संभाजी महाराजांचं देता येईल. त्यांनीही गादीवर बसताच स्वतःला सिद्ध करण्यासाठी बऱ्हानपूर लुटलं व औरंगजेबाच्या फौजेचा धुव्वा उडवला. तिसरं उदाहरण औरंगजेबाचं देता येईल. राजगादीवर येतांना भावाची हत्या आणि वडीलांना नजरकैदेत टाकलं. त्यामुळं त्यांचं सक्षमीकरण प्रजेला दिसलं. त्यामुळं आपोआपच त्यांचा दरारा वाढला. चवथं उदाहरण म. गांधींचं देता येईल. त्यांनीही बार्डोली व चंपारण्याचा उठाव करुन स्वतःला सक्षम केलं होतं. तसंच डॉक्टर बाबासाहेबांचंही उदाहरण देता येईल. त्यांनीही चवदार तळ्याचा सत्याग्रह व तो खटला लढून स्वतःला सिद्ध केलं होतं.

कालच्या परिस्थितीत ज्यानं स्वतःला सक्षम बनवलं. तोच राजा बनला. देवादिकांच्या भाषेत सांगायचं झाल्यास देवांचेही काही चमत्कार सांगीतले आहे. ते चमत्कार म्हणजेच त्यांचं सक्षम असण्याचे पुरावे. आता ते चमत्कार कोणी पाहिले? कोणीच नाही. परंतु आजही त्यांच्या चमत्कारावर आपण विश्वास ठेवतो. त्यामुळंच आजही त्यांचीच आपण प्रतिमा पुजतो ना.

विशेष सांगायचं झाल्यास आजही आपल्याला स्वतः सक्षम होण्याची गरज आहे. आपण जेव्हा स्वतः सक्षम होवू. तेव्हाच हा समाज आपलं ऐकेल. आपल्याला मान देईल. आपली इज्जत करेल. आजच्या काळात असं कोणीही समजू नये की पैशानंच आपण सक्षम होवू शकतो. आज अशी बरीचशी उदाहरणं आहेत की ज्यांच्याजवळ भरपूर पैसा आहे. परंतु तो पैसा पाहण्यासाठी आहे. त्याची कोणी इज्जत करीत नाही. कारण आज पैशाला जरी महत्व असलं तरी पैशानं सक्षम होणाऱ्या व्यक्तीची इज्जत ही तात्पुरती असते. ती कालानुकालीक नसते. कालानुकालीक इज्जत कमविण्यासाठी स्वतःला कर्मानं सक्षम बनविण्याची गरज आहे. ज्यांची कर्म चांगली, तो अधिक प्रभावशाली असतो. शिवाय हे प्राचीनकाळापासून चालत आलेले आहे. आज अशी कितीतरी नावं घेता येतील की जे चांगल्या कर्मानं आजही जगात प्रसिद्ध आहेत. जसे भगवान राम, क्रिष्ण, तथागत भगवान गौतम बुद्ध, वर्धमान महावीर, येशु ख्रिस्त, मोहम्मद पैगंबर, सम्राट अशोक, पृथ्वीराज चव्हान, सम्राट अकबर, शिवाजी महाराज, मं. गांधी, बाबासाहेब आंबेडकर. अशी बरीच मोठी यादी होईल की जे आपल्या डोळ्यासमोरुन जात नाहीत. त्याचं कारण म्हणजे त्या लोकांची चांगली कर्म.

महत्वपूर्ण बाब ही आज लोकांनी चांगली कर्म करावीत. जे जेवढ्या जास्त प्रमाणात चांगले कर्म करतील. त्यांचं नाव जगात इज्जतीनं घेतलं जाईल. पैशावर प्रेम करणारे भरपूर असतात. हे आपण आजपर्यंत पाहात आलो आहोत. परंतु जो कर्मावर प्रेम करतो. तोच अमर होतो व त्यांची जगात जयजयकार होते. आपल्याला गाडगेमहाराज माहीत असेलच. संत ज्ञानेश्वर माहीत असेलच आणि त्याचबरोबर माहीत असेल संत तुकाराम. काय होतं त्यांचेजवळ. तरीही त्यांना आजही जग ओळखतोय. त्याचं कारण आहे, त्यांच्यातील चांगले कर्म. त्यांनी स्वतःला चांगल्या कर्मानं सक्षम बनवलं होतं. म्हणूनच आजही त्यांचं नाव आदरानं घेतलं जातं.

महत्वाचं म्हणजे चांगले कर्म करा. म्हणजे त्याचं फळ चांगलंच मिळेल. वाईट कर्माचं फळ वाईटच मिळेल. जो जसा कर्म करेल. त्याचं त्याचं तेवढ्या प्रमाणात कमी अधिक चांगलं वाईट फळ मिळेलच. कर्मानुसार फळप्राप्ती.

विशेष सांगायचं झाल्यास स्वतः वाटत असेल की आपलीही इज्जत समाजानं करावी तर आपण स्वतः सक्षम बनावं. त्यासाठी चांगलं कार्य करावं. कारण वाईट व्यक्तींची इज्जत समाजात नसते. इज्जत असते चांगल्या माणसांची. चांगली इज्जत ही पैशानं मिळत नाही पैशानं येते फक्त क्लेश, अहंकार व दुःख. ते येवू नये व जीवनात आनंद यावा यासाठी चांगले कर्म करायला हवीत. जेणेकरुन त्यातून आपल्यालाच अधीकच सक्षम बनवा येईल व समाज आपली इज्जत करु शकेल. यात शंका नाही.

–अंकुश शिंगाडे
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

भेसळखोरांना रोखा

पनीरपासून तयार करण्यात आलेले डिशेस सर्वचजण चवीने खातात. लहान मुलांना तर पनीर खूपच आवडते. मात्र ह्याच सर्वांच्या आवडत्या पनीरमध्ये भेसळ होत असल्याची आणि राज्यभरात विकले जाणारे पनीर बनावट असल्याचा मुद्दा श्रीगोंद्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी विधानसभेत मांडला. राज्यात विकले जाणारे पनीर बनावट असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होतीच, आमदारांनी त्यावर शिक्कामोर्तब केले. बनावट पनीर तयार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी केली. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या महत्वाच्या मुद्द्यावर चर्चा घडवून आणल्याबद्दल आमदार पाचपुते तसेच भेसळखोरांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे म नापासून आभार!

बनावट पनीर तयार करून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या महाभागांना शिक्षा झाली पाहिजेच, पण केवळ बनावट पनीर तयार करणारेच नव्हे तर सर्व भेसळखोरांवर कारवाई झाली पाहिजे. राज्यात भेसळखोरांनी उच्छाद मांडला आहे. राज्यात दूध भेसळीचे प्रकार वाढत आहेत. एक लिटर दुधात काही रासायनिक पदार्थ टाकून वीस लिटर दूध बनवण्याचे प्रकार सुरू आहेत. मागील वर्षी अहिल्यानगर जिल्ह्यातच दूध भेसळीचे रॅकेट उघडकीस आले होते. दौंडमध्येही म्हशींनी अधिक दूध द्यावे यासाठी त्यांना प्रतिबंधक इंजेक्शन दिले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. केवळ दुधातच नव्हे तर मिठाईमध्येही भेसळ केली जात आहे. मिठाई बनवताना वापरण्यात येणाऱ्या खव्यामध्येही भेसळ असल्याच्या अनेक घटना राज्यात उघडकीस आल्या आहेत.

बर्फी किंवा खवा दुधापासूनच बनतो अशी सर्वसामान्यांची धारणा असते. फराळाचे पदार्थ बनवण्यासाठी त्याचा उपयोग केला जातो. लहान मुलांना हे खव्यापासून तयार केलेले पदार्थ खूप आवडतात. त्याला मागणीही जास्त असते, त्यामुळेच वर्षानुवर्षे पडलेली दुधाची पावडर, स्टार्च, वनस्पती तूप, दूध याबरोबरच काही प्रमाणात रसायन मिसळून तयार केलेला निकृष्ट खवा भेसळखोर बाजारात खपवीत आहेत. काही भेसळखोर दर्जेदार खाद्यान्नाच्या ब्रॅण्डशी साम्य असणारे बनावट, कमअस्सल तब्येतीला घातक पदार्थ सारख्याच दिसणाऱ्या वेष्टनातून विकत आहेत. हे पदार्थ शहरातील प्रश्नार्थक वातावरणात बनवले जातात. हे पदार्थ रस्त्यांवर कुत्री, मांजरी फिरण्याच्या ठिकाणी वाळत घातलेले दिसतात.

भेसळखोरांमुळे ग्राहकांचे आरोग्यच धोक्यात आले आहे. दूध, मिठाई आणि खाद्यपदार्थांत भेसळ होत असल्याने ग्राहकांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. भेसळयुक्त दुधामुळे ग्राहकांचे हृदय, किडनी व यकृत निकामी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. दुधातील भेसळीमुळे शरीर वाढीसाठी आवश्यक असणारे लायसीन हे अमिनो आम्ल शरीरास उपलब्ध होत नाही, परिणामी लहान मुलांच्या शरीर वाढीवर परिणाम होऊन शरीराची वाढ खुंटते, शिवाय उच्च रक्तदाब व हृदय विकारासारखे आजार जडतात. भेसळयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने आगामी वीस वर्षांत देशातील तीस ते चाळीस टक्के लोकांना कर्करोग होऊ शकतो असा इशाराच जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे. हे एक प्रकारचे स्लो पॉईजन आहे. हे स्लो पॉईजन देऊन ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणारे मोठे रॅकेट राज्यभरात कार्यरत आहे. या रॅकेटचा आणि त्यात सहभागी असलेल्या समाजकंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करायला हवी.

राज्यातील भेसळखोरी रोखण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाची अर्थात एफडीएची आहे. ते त्यांची जबाबदारी पार पाडतही आहेत, त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाच्या नवी मुंबई परिमंडळ २ ला अलीकडेच नवी दिल्लीच्या ईट राईट इंडियाच्या उपक्रमात सहभागी होऊन २०२२ - २३ साठीचे पाच लाखांचे पारितोषिक अन्न सुरक्षा मानके प्राधिकरणाचकडून प्राप्त झाले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदनच मात्र एफडीआयच्या कारवाईत सातत्य नाही. कारवाईत सातत्य नसल्यानेच भेसळखोरांना त्यांची भीती वाटेनाशी झाली आहे.

एफडीआयचा वचक नसल्यानेच राज्यात भेसळखोरी वाढली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. दूध आणि खाद्य पदार्थातील भेसळखोरी रोखण्यासाठी पोलीस आणि एफडीएने एकत्र येऊन राज्यभरात धडक मोहीम राबवायला हवी. कमी श्रमात अधिक नफा मिळवण्यासाठी ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या भेसळखोरांना थेट फाशीचीच शिक्षा द्यायला हवी.

–श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

१२ महत्त्वाचे कायदे मंजूर; अर्थसंकल्पावर सकारात्मक चर्चा -मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई– महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण १२ महत्त्वाचे कायदे मंजूर करण्यात आले असून,दरदिवशी सरासरी ९ तास कामकाज चालले. राज्यासम ोरील महत्त्वाच्या प्रश्नांवर विस्तृत चर्चा झाली. सरकारने चर्चेला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, विरोधी पक्षालाही त्यांच्या मुद्द्यांसाठी संपूर्ण संधी देण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या अधिवेशनात महत्वाच्या विधेयकांमध्ये माथाडी कामगार कायद्यातील सुधारणा विधेयकाचा सम ावेश असून या विधेयकामुळे बनावट माथाडी आणि ब्लॅकमेलिंग रोखण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक विधेयक आणि विनियोजन विधेयकासह अनेक महत्त्वाची विधेयके संमत करण्यात आली. या अधिवेशनात संविधानावर विशेष चर्चा झाली, तसेच अर्थमंत्री यांनी शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार आणि सामाजिक विकास या पंचसूत्रीवर आधारित अर्थसंकल्प सादर केला आहे,जो महाराष्ट्राच्या विकासाला नवी गती देईल.

मुख्यमंत्री यांनी अधिवेशनाच्या यशस्वीतेबद्दल सर्व आमदार, मंत्री, पिठासीन अधिकारी, विधानमंडळ कर्मचारी आणि माध्यम ांचे आभार मानले.

१३ कोटी लोकांच्या विकासाचा अर्थसकंल्प :- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की,सर्व कल्याणकारी योजना सुरू ठेवून अर्थव्यवस्था बिघडू न देता अर्थसकंल्प सादर केला.राज्यातील १३ कोटी लोकांच्या विकासाच्या दृष्टीने विचार करून अर्थमंत्री अजित पवार यांनी अतिशय चांगला अर्थसंकल्प सादर केला. विकासाचे आणि लोकाभिमुख प्रकल्प शासन राबवित आहे. शेतकरी, कष्टकरी , कामगार वर्ग या सर्व घटकांचा विचार राज्य चालवताना करत आहोत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, एकीकडे विकास प्रकल्प आणि दुसरीकडे कल्याणकारी योजना पुढे नेताना सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून काम करित आहोत. परकीय गुंतवणूक वाढविण्यातही राज्य अग्रेसर असून, दाओस येथे झालेल्या परिषदेत १५ लाख कोटीचे करार करण्यात आले. एक खिडकी योजनेअंतर्गत राज्यात उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढावी यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्यासाठी उद्योगांना प्रोत्साहन दिले जात आहे. स्टार्ट अपमध्ये राज्य अव्वल असून, आपल्या राज्यावर इतर राज्यांच्या तुलनेत कर्जही कमी आहे. १०० दिवसांच्या काम काजाचे उद्दिष्ट मुख्यमंत्री यांनी सर्व विभागांना दिले होते, त्यानुसार सर्व विभागांनी उत्तम काम पार पाडले असून, अनेक विभागांनी उद्दिष्ट पुर्ण केले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

'मराठवाडा वॉटर ग्रीड' प्रकल्पातून मराठवाड्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना

मुंबई : मराठवाड्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी मराठवाड्यातील ११ मोठी धरणे पाईपलाईनद्वारे जोडून शहरे आणि गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी 'मराठवाडा वॉटर ग्रीड' योजना राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्याला शाश्वत पाणी उपलब्ध होणार आहे, तसेच प्रकल्पाच्या उभारणीसाठी जागतिक स्तरावरील बँकांचा सहभाग आहे असे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी विधानसभेत सांगितले.

पाणीपुरवठा मंत्री श्री. पाटील म्हणाले, मराठवाड्यातील पाणी प्रश्नावर कायमस्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. 'मराठवाडा वॉटर ग्रीड' प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्याला दीर्घकालीन स्वरुपात पाणी उपलब्ध होणार आहे. तसेच केंद्र सरकारच्या सूचनेनुसार राज्य शासन वर्ल्ड बँक, आशियायी विकास बँक यासारख्या बँकांमार्फत कर्ज स्वरुपात निधी उभारणी करुन 'मराठवाडा वॉटर ग्रीड' प्रकल्पाची उभारणी करत या प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्याला कायमस्वरुपी पाणी उपलब्ध होईल, असेही श्री पाटील यांनी सांगितले.

मतदार याद्यांच्या निरंतर अद्ययावतीकरण प्रक्रियेबाबत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत बैठक

मुंबई : मतदार याद्यांचे निरंतर अद्ययावतीकरण करण्याची प्रक्रिया आणि प्रत्येक मतदान केंद्राकरिता राजकीय पक्षांकडून मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची नियुक्ती यासंदर्भात मुख्य निवडणूक अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव एस.चोक्कलिंगम यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधी समवेत बैठक झाली.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे डॉ.गजानन देसाई, भारतीय जनता पक्षाचे गोपाळ दळवी, शिवसेना पक्षाचे विलास जोशी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे रवींद्र पवार, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सचिन परसनाईक तसेच विविध मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राजकीय पक्ष हे निवडणूक प्रक्रियेतील महत्वाचे भागीदार आहेत. भारत निवडणूक आयोग यांच्या निर्देशाप्रमाणे राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीशी क्षेत्रिय तसेच राज्यस्तरावर नियमितरित्या बैठका घेऊन निवडणुकीच्या विविध विषयाबाबत समन्वय राखण्यात येत आहे. त्यानुसार राज्यातील मतदार नोंदणी अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या स्तरावर १७ ते २० मार्च २०२५ या कालावधीत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधी समवेत बैठका घेण्यात आल्या असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव एस.चोक्कलिंगम यांनी यावेळी दिली.

थोडक्यात...

आज शिवाजी हायस्कूलमध्ये प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम

नवनांदेड (प्रतिनिधी)– महसुल व वनविभाग महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्यावतीने सिडको येथील शिवाजी विद्यालयात दि. २८ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे.

उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ व नांदेड तहसीलदार संजय वारकड, नायब तहसिलदार काशीनाथ डांगे, स्वप्निल दिगलवार व संजय नागमवाड, मंडळ अधिकारी अनिल धुळगंडे, विमल सेतु सुविधा केंद्राचे विजय जोंधळे, मुख्याध्यापक साहेबराव देवरे, तलाठी अंजुषा जाधव यांच्या शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित राहणार आहेत.

दिपाली मस्के व प्रकाश ढाले यांना पुरस्कार

नांदड (प्रतिनिधी)– पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबिरात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील तीन स्वयंसेवक व दोन स्वयंसेविका व एक संघ व्यवस्थापक सहभागी झाला होता. या शिबिरामध्ये विद्यापीठातील दिपाली मस्के यांना उत्कृष्ट वक्ता द्वितीय क्रमांक पुरस्कार व काव्य संमेलनात प्रकाश ढाले यास द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, वित्त व लेखा अधिकारी मोहम्मद शकील अब्दुल करीम, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे आदींनी अभिनंदन केले आहे.

जमिनीचा पोत सुधारण्यासाठी प्रकल्पातील गाळ लाभदायक -जिल्हाधिकारी कर्डिले

- १०० दिवसांच्या आराखड्यानुसार भोकर येथील उपविभागीय व तहसिल कार्यालयास भेट
- नारवट येथील वनविभागाच्या तळ्यातील गाळ काढण्याच्या कामास प्रारंभ

भोकर (प्रतिनिधी)– 'गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार' योजनेअंतर्गत भोकरच्या सुधा प्रकल्पातील गाळ काढण्यात येत आहे. हा गाळ काढल्यामुळे या प्रकल्पातील पाण्याचा साठा वाढून सभोवतालच्या शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना जमीनीची सुपीकता वाढविण्यासाठी काढण्यात आलेला गाळ विनामुल्य उपलब्ध होणार आहे. शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

बुधवारी 'गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार' योजनेअंतर्गत भोकर येथे सुधा प्रकल्पातील गाळ काढण्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भोकरचे उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, तहसिलदार विनोद गुंडमवार, तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव व इतर विभागाचे विभाग प्रमुख यांच्यासह सेवा समर्पण परिवारातील सदस्य, मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांची उपस्थिती होती.

याकामा सोबत नारवट येथील वन विभागाच्या तळयातील गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. हा गाळ वन विभाग, सेवा समर्पण परिवार व नारवट येथील ग्रामस्थ यांच्या श्रम दानातून काढण्याची मोहिम राबविण्यात येणार आहे. त्याचे काम बुधवारी सुरु करण्यात आले आहे.

या कार्यक्रमानंतर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालय भोकर येथे भेट देवून १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत होत असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेवून सर्व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बेकायदेशीर बांधकामाला न्यायालयाकडून स्थगिती

नांदेड (प्रतिनिधी) – भुसंपादन झाल्यानंतर संपादीत करण्यात आलेल्या मुळ नकाशाप्रमाणे काम करण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे निर्देश असूनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मनमानी सुरु होती. यावरून हस्सापूर येथील शेतकरी उत्तम भिमराव काकडे यांनी नांदेडच्या दिवाणी न्यायालयात दाद मागितल्यानंतर न्यायालयाने बेकायदेशीर बांधकामाला स्थगिती दिली आहे.

हस्सापूर येथे उत्तम भिमराव काकडे यांचे शेत गट क्रं १५/अ/१ मधून नांदेडचा पश्चिम वळण रस्त्यासाठी २१ आर जमीन संपादीत केली होती. परंतू त्यांना मिळालेली नोटीस ४५ आर जमीनीची होती. या बाबत सन २०१३ पासून अनेक निवेदन दिले. काकडे यांच्या वतीने मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनानंतर मुख्यमंत्र्यांचे निर्देश आहेत असे पत्र कार्यासन अधिकाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंत्यांना २०२३ मध्ये दिले. तरी पण संपादीत केलेल्या जमीनीपेक्षा जास्त जमीनीवर बांधकामाच्या निशाण्या करून सार्वजनिक बांधकाम विभागाने कामाची सुरुवात केली. त्यामुळे उत्तम काकडे यांनी सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर नांदेड यांच्या न्यायालयात आरसीएस क्रमांक १०८/२०२५ हा खटला दाखल केला. या खटल्यात जिल्हाधिकारी नांदेड, उपविभागीय अधिकारी, भुसंपादन अधिकारी-२, जिल्हा अधिक्षक भुमिअलिखे कार्यालय नांदेड आणि सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड यांना प्रतिवादी करण्यात आले. या प्रकरणात उत्तम काकडे यांच्यावतीने ॲड. सुदर्शन भोसले यांनी बाजू मांडली. युक्तीवाद ऐकल्यानंतर या प्रकरणातील कोणत्याही प्रतिवादीने किंवा त्यांच्या वतीने कोणी व्यक्तीने उत्तम काकडे यांच्या शांतता पुर्ण ताब्यात अर्थात शेत गट क्रमांक १५/३/१ मध्ये कोणताही हस्तक्षेप करू नये, असे न्यायालयाने आदेश जारी केले आहेत. कायदेशीर रित्या भुसंपादन झाल्यानंतर त्यापेक्षा जास्त जागेवर चुकीच्या पध्दतीने काम करण्याच्या पध्दतीला न्यायालयाने चपराक दिली आहे.

मराठा सेवा संघ कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

नांदेड (प्रतिनिधी)– मराठा सेवा संघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतील निवडक ५० पदाधिकाऱ्यांसाठी लेव्हल वन केडर कॅम्प रायपूर (छत्तीसगड) येथील वृंदावन गार्डन येथे सुरु आहे, अशी माहिती प्रमुख आयोजक तथा मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रविन्द्र दाणी, राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुनील महाजन, छत्तीसगढ प्रदेश अध्यक्ष राजेश सावळे, महासचिव देवेंद्रराव वाशिंग, प्रा कपिल पिचेवार यांनी दिली आहे.

क्रांतिपुरुष ॲड. पुरुषोत्तम खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, महामंत्री प्रदीप पाटील पुढाकाराने आयोजित या विशेष प्रशिक्षण शिबिराकरिता मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय प्रशिक्षण प्रमुख ज्येष्ठ विचारवंत प्रा. गंगाधर बनबरे आणि संत गाडगेबाबा प्रबोधन परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवाजीराजे पाटील यांना आमंत्रित करण्यात आले. नेतृत्व कौशल्य विकास, संभाषण कौशल्य विकास, संगठन कुशलता विकास, लेखन कौशल्य विकास, भारताचा सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक इतिहास, कौटुंबिक स्नेहसंबंध, सकारात्मक मानसिकता, इत्यादी अनेक महत्वपूर्ण विषयांवर शिवाजीराजे पाटील तथा प्रा गंगाधर बनबरे हे मार्गदर्शन करणार आहेत.

या दोन दिवसीय लेव्हल वन केडर कॅम्पमध्ये प्रशिक्षित पदाधिकाऱ्यांसाठी तीन दिवसीय सेकंड लेव्हल कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीराचेही लवकरच आयोजित करण्यात येईल असे कामाजी पवार, सुनील महाजन, डॉ. संजय पाटील, सोपान क्षीरसागर यांनी जाहिर केले आहे. तब्बल साडेतीन दशकांपासून देशविदेशातील हजारो विद्यार्थ्यांना निःस्वार्थीपणे मोफत मार्गदर्शन करणारे अनुभवसंपन्न प्रशिक्षक शिवाजीराजे पाटील या केडर कॅम्पसाठी परिश्रम घेत आहेत.

जिल्हा प्रशासनाच्या आश्वासनानंतर 'जनवादी'च्या महिलांनी उपोषण सोडले

नांदेड (प्रतिनिधी)– अतिवृष्टीतील अनुदान वाटप यादीमध्ये अनियमितता झाल्यामुळे व मनपाच्या क्षेत्रीय कार्यालयात अर्ज दाखल केलेल्या अर्जदारांना अनुदान देण्यात यावे तसेच शासन आदेश डावलून पूरग्रस्तांची तयार केलेली यादी रद्द करावी या प्रमुख मागण्यांसाठी अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या (जमसं) जिल्हाध्यक्षा व उपाध्यक्षांचे २० मार्चपासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषण सुरु होते.

उपोषणार्थीची तब्येत खालावल्यामुळे संघटनेच्या जिल्हाध्यक्षा व उपाध्यक्षा या दोघींना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यापैकी कॉ. करवंदा गायकवाड यांची तब्येत जास्त प्रमाणात खालावली होती व त्यांचा बीपी १८० पेक्षा जास्त झाला होता.

त्या अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर आणि उप विभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल आणि कुणीही खरा पूरग्रस्त अनुदानापासून वंचित राहणार नाही. असे आश्वासन दिले. त्यानंतर माहिलांनी उपोषण मागे घेतले.

यावेळी नांदेडचे तहसीलदार संजय वारकड, मनपाचे उपायुक्त अजितपालशिंघ संधू, आपत्ती अधिकारी डॉ. मिर्झा बेग यांची उपस्थिती होती. आंदोलकांच्या व उपोषणार्थीच्या वतीने माकप सेक्रेटरी कॉ. गंगाधर गायकवाड, उपोषणार्थी तथा जमसंच्या जिल्हाध्यक्षा कॉ. लता गायकवाड, डीवायएफआयचे कॉ. जयराज गायकवाड, मजदूर युनियनचे कॉ. सोनाजी कांबळे आदींनी बैठकीत सहभाग घेतला.

आरडीसी आणि एसडीएम यांच्या आश्वासनाने जमसंच्या महिला पुढाऱ्यांनी आपल्या आमरण उपोषणास स्थगिती दिली असल्याचे सांगण्यात आले.

एनसीसी, सरळ सेवा भरतीसाठी स्टँडर्ड ट्रेनिंग सेंटरचा कोठारीच्या शाळेत शुभारंभ

किनवट (प्रतिनिधी)– एनसीसी व सरळ सेवा भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्टँडर्ड ओब स्टॅकल ट्रेनिंग सेंटरचा शुभारंभ मातोश्री कमलताई ठमके इंग्लिश स्कूल कोठारी येथे दि.२५ करण्यात आला. कमांडिंग ऑफिसर कर्नल एन. रंगराव, कर्नल के. दिलीप रेड्डी व संस्थेचे अध्यक्ष अभियंता प्रशांत ठमके यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

एनसीसी बटालियनच्या सलामीनंतर मान्यवरांनी ट्रेनिंगसाठी उपलब्ध विविध सुविधांची पाहणी केली. मातोश्री कमलताई ठमके सभागृहात पार पडलेल्या छोटेखानी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशांत ठमके होते. कर्नल एन. रंगाराव, कर्नल दिलीप रेड्डी, आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी प्रदीप नाईक, सहायक प्रकल्प अधिकारी शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. कर्नल एन. रंगाराव यांनी विद्यार्थी जीवनात एनसीसीचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी महाराष्ट्र बटालियनच्यावतीने संस्थेचे अध्यक्ष प्रशांत ठमके यांचा स्मृतीचिन्ह देवून सत्कार केला. अध्यक्षीय समारोपात अभियंता प्रशांत ठमके यांनी भविष्यातही विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली.

कार्यक्रमास सुभेदार मेजर घनश्याम, सुभेदार राकेश कुमार, हवालदार खिल्ला रमेश व अन्सारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्राचार्य प्रमोद मुनेश्वर, उपमुख्याध्यापक किशोर डांगे, ज्ञानेश्वर कदम यांनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन प्रा. संतोष बैस ठाकूर यांनी केले. आभार ज्ञानेश्वर कदम यांनी मानले.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी करावी -तहसीलदार शिंदे

बिलोली (प्रतिनिधी) – शासनाने 'ॲग्रीस्टॅक' म्हणजेच शेतकरी ओळखपत्र क्रमांक देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या क्रमांकामुळे आपल्या जमिनीची माहिती आधार क्रमांकाशी जोडली जाईल आणि शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध सरकारी योजनांचा लाभ सहज मिळणार आहे.त्यामुळे शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी लवकरात लवकर सी. एस. सी केंद्रावर जाऊन ॲग्रीस्टॅक नोंदणी करावी असे आवाहन बिलोलीचे तहसीलदार गजानन शिंदे यांनी केले आहे.

शासनाच्या कृषीविषयक योजना अधिक पारदर्शक आणि जलद कार्यान्वित करण्यासाठी हे ओळखपत्र उपयुक्त ठरणार असून पीएम किसान सन्मान निधी दरवर्षी थेट बँक खात्यात जमा होण्यास मदत होईल. शेतकऱ्यांसाठी विशेष सवलतीसाठी ॲग्रीस्टॅक ओळखपत्र महत्वाचे ठरणार आहे. ॲग्रीस्टॅकच्या नोंदणीसाठी बिलोली तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी आधार कार्ड, आधारशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक व ७/१२ उतारा घेऊन ग्रामपंचायत कार्यालय, उडउ सेंटर, आपले सरकार सेवा केंद्र, तलाठी कार्यालयात जाऊन तत्काळ नोंदणी करून घ्यावी असे आवाहन तहसीलदार गजानन शिंदे यांनी केले आहे.

नांदेड : तेर (जि. धाराशिव) येथील श्री संत गोरोबा काका यांच्या समाधी मंदिराच्या प्रस्तावित महाद्वार पूर्वीच्याच ठिकाणी (पूर्व दिशेला) उभारण्यात यावे, अन्यथा दि. २ एप्रिल रोजी आमरण उपोषण करण्याबाबतचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांना देण्यात आले. स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्था प्रदेशाध्यक्ष विजयराव देवडे, प्रदेश सचिव शिवाजी पांगरेकर, जिल्हाध्यक्ष लक्ष्मणराव विभुते, युवा प्रदेश अध्यक्ष संदीप अवनुरे, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठलराव किवळेकर, सोपानराव कानगुले सुभाषनगर, हनुमंतराव कानगुले, मारोती नागपूरे, भुमन्ना नागपूरे, चंद्रकांत नागपूरे, राजेश कानगुले, संतोष कानगुले, ज्ञानेश्वर देवडे यांची यावेळी उपस्थिती होती. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

श्री शिवमहापुराण कथा सोहळ्यामध्ये शिवपार्वती यांचा विवाह उत्साहात संपन्न

नवीन नांदेड (प्रतिनिधी)– गुरूकृपा भजनी मंडळ सिडको यांच्या वतीने आयोजित शिवपुराण कथा मध्ये पाचव्या दिवशी शिवपार्वती विवाह सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. हा सोहळा पाहण्यासाठी परिसरातील भाविकांनी गर्दी केली होती. हभप अनिल महाराज माजलगावकर यांच्या काल्याच्या किर्तन व महाप्रसादाने गुरुवारी सांगता झाली.

गुरुकृपा महिला मंडळाच्या वतीने २० ते २७ मार्च दरम्यान गुरूवार बाजार सिडको येथे शिवकथा श्री शिवमहापुराण कथा सुरु होती. प्रवक्ते भागवताचार्य अनिल महाराज माजलगांवकर, तबला वादक श्रीहरी लोहा व पेटीवादक गोविंद नायबळ यांच्या सुमधूर वाणीतून शिवपुराण कथेचे श्रवण करण्यात आले.

२५ मार्च रोजी शिवपुराण कथेमध्ये शिवपार्वती विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पती-पत्नी असलेले गिता राजु पेटकर यांनी महादेव पार्वतीचा सजीव देखावा सादर केला होता. यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

२७ मार्च रोजी श्रीहभप अनिल महाराज माजलगांवकर यांच्या किर्तनानंतर महाप्रसादाला सुरुवात करण्यात आली. महाप्रसादाचा पंचक्रोशीतील शेकडो भक्तांनी लाभ घेतला, अशी माहिती गुरू कृपा महिला मंडळ पदाधिकारी एन.डी.१२० गुरूवार बाजार सिडको नवीन नांदेड यांच्यावतीने देण्यात आली आहे.

मूल्याधिष्ठित शिक्षण: नव्या शैक्षणिक धोरणाचा पाया -डॉ. संदीप काळे

नांदेड (प्रतिनिधी)– शिक्षण हे केवळ माहिती प्रदान करणारे साधन नसून, ते विद्यार्थ्यांच्या चारित्र्य, नैतिकता आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम असले पाहिजे. नवीन शैक्षणिक धोरणाचा पाया म्हणजे मूल्याधिष्ठित शिक्षण आहे, असे प्रतिपादन डॉ. संदीप काळे यांनी केले.

जनप्रगती सेवाभावी संस्था, नांदेड संचलित संस्कृती पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनप्रगती सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सतीश बोडखे तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार बालाजी कल्याणकर यांच्या सुविद्य पत्नी सौ. संध्याताई कल्याणकर, मुख्याध्यापिका सौ. पल्लवी उंबरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. संदीप काळे यांनी मूल्याधिष्ठित शिक्षण: नव्या शैक्षणिक धोरणाचाल पाया या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी नवीन शैक्षणिक धोरणातील मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या महत्त्वावर विशेष भर दिला. शिक्षणातील मूल्यशिक्षणाच्या घटकांना महत्त्व देण्याची आवश्यकता अधोरेखित केली आणि सांगितले की नैतिकता, सामाजिक जाणीव, सहकार्य, सृजनशीलता

आणि जबाबदारीची भावना विकसित करणे हे शिक्षणाच्या केंद्रस्थानी असले पाहिजे. प्रभावी अंमलबजावणीसाठी त्यांनी विविध उदाहरणे दिली. शिक्षणसंस्थांनी केवळ अकादमिक गुणवत्तेवर भर न देता, विद्यार्थ्यांना वास्तव जीवनातील परिस्थितींना सामोरे जाण्यासाठी सक्षम करणे गरजेचे आहे. त्यांनी शिक्षण क्षेत्रात सक्रिय असलेल्या शिक्षक, पालक आणि समाज यांची एकत्रित भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर त्यांच्या नैतिक आणि बौद्धिक प्रगल्भतेसाठी मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शिक्षकांनी पार पाडावी, असेही डॉ. संदीप काळे यांनी सांगीतले. मूल्याधारित शिक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षणसंस्थांनी अनुभवाधारित शिक्षणतंत्रांचा अवलंब करावा असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या अंतःप्रेरणेला चालना देणारे आणि त्यांना समाजाच्या भल्यासाठी योगदान देण्यास प्रवृत्त करणारे शिक्षण हेच खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरते, असे ते म्हणाले. त्यांच्या या विचारांमधून केवळ ज्ञानाधारित नव्हे, तर जीवनमूल्यांवर आधारित आणि विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक आयुष्यात सकारात्मक बदल घडवणारे शिक्षण कसे असावे, याबद्दल डॉ. काळे यांनी विवेचन केले.

स्नेहसंमेलनाच्या सांस्कृतिक सत्रात गोंधळ, नाचरे मोरा, घुमर या गाण्यांवर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या बहारदार नृत्यांनी उपस्थित मान्यवर आणि पालकांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे सदस्य डॉ. राजेश उंबरकर, प्रणव बोडखे तसेच शाळेच्या सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या सोहळ्यास मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

युवा

महाबळेश्वर

गेट सेट गो...

छोटी सुट्टी असो की मोठी सुट्टी... सतत नाविन्याच्या शोधात असलेल्या पर्यटकांना उन्हाळी वातावरणात वेध लागले आहेत, ते लांब पल्ल्याच्या सहली अन् परदेशवारीचे. अनेकांनी राज्यातील थंड हवेची ठिकाणे, जंगलं, विविध राज्यांमधील लोकप्रिय पर्यटन स्थळे आणि परदेश सहलींचेही जोरदार नियोजन केले आहे. सहलीला निघालेल्या या पर्यटकांच्या नियोजनाचा उपयोग होईल तुम्हालाही...

निसर्गरम्य पर्यटन स्थळ

महाबळेश्वर हे सातारा जिल्ह्यातील लोकप्रिय निसर्गरम्य थंड हवेचे पर्यटन स्थळ आहे. हे ठिकाण समुद्रसपाटीपासून चार हजार पाचशे मीटर उंचीवर वसलेले आहे. सातारा ते महाबळेश्वर ५० किलोमीटर, पुणे ते महाबळेश्वर ११५ किलोमीटर, मुंबई ते महाबळेश्वर २४५ किलोमीटर आंतर आहे. महाबळेश्वरमध्ये आर्थर सीट पॉइंट, इको पॉइंट ,वेण्णा लेक पॉइंट, लिंगमळा वॉटर फॉल, फॉकलंड पॉइंट ,सन सेट पॉइंट, श्री महाबळेश्वर क्षेत्र, पंचगंगा मंदिर अशी जवळपास ३० प्रेक्षणीय स्थळे आहेत.

महाबळेश्वर मध्ये काय पहाल ?

- आर्थर सीट पॉइंट : महाबळेश्वरमधील पर्यटकांचा लोकप्रिय पॉइंट आहे. या पॉइंटच्या एका बाजूला खोल दरीतून कोकणात जाणारी सावित्री नदी आहे, तर दुसऱ्या बाजूला घनदाट जंगल आहे. या पॉईंटवरून महाबळेश्वरचा निसर्गरम्य परिसर आणि मनमोहक दृश्य पर्यटकांना आकर्षित करतात. याच पॉइंटवरून रायगड किल्ला आणि तोरणा किल्ला पाहताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची आठवण होते.
- ईको पॉईंट : आर्थर पॉईंटकडे जाताना मार्गावरच इको पॉईंट आहे. निसर्गरम्य परिसर, उंच पर्वत रांगा, खोल दऱ्या आणि आरोग्यदायी वातावरण यामुळे पर्यटक या ठिकाणी सकाळी जाणे पसंत करतात.
- फॉकलंड पॉइंट : महाबळेश्वर येथे फॉकलँड पॉइंटवरून कोयना नदीचे दर्शन होते. मावळत्या सूर्याचे दर्शन घेण्यासाठी पर्यटक या ठिकाणीसुद्धा येतात. या वेळी अतिशय विहंगम आणि मनमोहक असे दृश्य पर्यटकांना आकर्षित करते.
- सनसेट पॉईंट : महाबळेश्वरमधील हा प्रसिद्ध पॉइंट असून याला बॉम्बे पॉईंट असेही म्हणतात. सर्व पर्यटक मावळत्या सूर्याचे दर्शन घेण्यासाठी याठिकाणी एकत्र येतात.
- वेण्णा लेक : महाबळेश्वर येथे वेण्णा लेक सरोवराची निर्मिती सातारचे राजे श्रीमंत छत्रपती आप्पासाहेब महाराज यांनी एकोणिसाव्या शतकात केली. हे सरोवर सुमारे २८ एकर क्षेत्रात पसरलेले आहे. बारमाही वाहणारे झरे यामुळे सरोवराचा परिसर फुलझाडांनी फुलला आहे. पावसाळ्यात वेण्णा सरोवरात पाण्याचा भरपूर साठा होतो. त्यामुळे पावसाळ्यानंतर पर्यटनास अतिशय योग्य असा काळ असतो.
- लिंगमळा वॉटरफॉल : पाचगणीकडे जाणाऱ्या रस्त्यावर वेण्णा सरोवराजवळ लिंगमळा आणि चिंतामण हे धबधबे पावसाळ्यात अतिशय सुंदर दिसतात.
- जुने महाबळेश्वर : भगवान महाबली (महादेव)या नावापासून या ठिकाणाला महाबळेश्वर हे नाव प्राप्त झाले आहे. महाबळेश्वरपासून पाच किलोमीटर अंतरावर जुने महाबळेश्वर आहे. या परिसरात अनेक धार्मिक स्थळे आहेत. महाबळेश्वरमध्ये यादव राजा सिंघण याने कृष्णाबाई मंदिर बांधले. या मंदिराला पंचगंगा मंदिर असेही म्हणतात. कारण या मंदिरातूनच वेण्णा, सावित्री, गायत्री, कृष्णा आणि कोयना या नद्यांचा उगम झाला असे मानतात.
- स्ट्रॉबेरी : महाबळेश्वर स्ट्रॉबेरीसाठी जगप्रसिद्ध आहे. महाबळेश्वरमध्ये स्ट्रॉबेरीची शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. महाबळेश्वरला आलेले पर्यटक स्ट्रॉबेरी आणि रास्पबेरी मोठ्या प्रमाणात खरेदी करतात.

महाबळेश्वरच्या परिसरातील पर्यटन स्थळे

महाबळेश्वरच्या परिसरात काही निसर्गरम्य आणि ऐतिहासिक पर्यटन स्थळे आहेत. महाबळेश्वरच्या दक्षिणेस कोयना, सोळशी व कांदार खोरी आहेत; तर पश्चिमेस छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला प्रतापगड किल्ला आहे. तसेच पाचगणी येथील टेबल लँड पर्यटकांचे आकर्षण स्थळ आहे. महाबळेश्वर हे पश्चिम घाटातील अतिशय निसर्गरम्य असे ठिकाण आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात उन्हाळी राजधानी म्हणून महाबळेश्वर प्रसिद्ध होते. येथील हिरवा निसर्ग, सुंदर बगीचे, घनदाट जंगल, दऱ्याखोऱ्या, उंच शिखरे पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात महाबळेश्वरला येतात. मार्च ते जून हा काळ महाबळेश्वरच्या पर्यटनासाठी योग्य आहे.

होम स्टेची चलती

जागतिक पातळीवर आता निवास-न्याहारी योजना लोकप्रिय ठरली आहे. पर्यटक वेगवेगळ्या वेबसाइटवरून लोकांच्या घरी राहण्याची ठिकाणे शोधत आहेत. कोकणातील उत्साही, हौशी मंडळींनी वीस वर्षांपूर्वीपासूनच होम स्टे सुविधा सुरू केली. त्या वेळी हॉटेलची संख्या मर्यादित असल्याने पर्यटक स्थानिकांच्या घरी राहत होते. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातच नव्हे; देशांतर्गत आणि परदेशातील सहलींमध्येही अनेक पर्यटक होम स्टेला पसंती देत आहेत. हॉटेलऐवजी स्थानिक व्यक्तीच्या घरी राहून तेथील आदरातिथ्य अनुभवण्याची क्रेझ पर्यटकांमध्ये वाढली आहे. होम स्टेचे अनेक पर्याय देणाऱ्या वेबसाइटचीही संख्याही वाढते आहे.

व्याघ्र दर्शनाला पसंती कायम

उन्हाचे चटके बसले तरी चालतील; पण यंदाच्या सुट्टीत जंगल सफारी करायची आणि व्याघ्र दर्शन घ्यायचे, असे ठरवून जंगल टुरिझमला जाणाऱ्यांची लाट यंदाही कायम आहे. वाघ, बिबट्या, हत्ती आणि इतर वन्यप्राण्यांबद्दल असलेल्या आकर्षणामुळे लोकांनी ताडोबा, पेंच, नागझिरा, कान्हा, बांधवगड, रणथंबोर, जिम कॉर्बेट या व्याघ्र प्रकल्पांमधील जंगल सफारीचे बुकिंग केले आहे. विविध संस्थांच्या जंगल कॅम्पबरोबर; तर काही लोक स्वतः नियोजन करून रानावनात फिरण्याचा, नेचर फोटोग्राफीचा मनसोक्त आनंद घेणार आहेत.

रेल्वे लोकप्रिय; पण विमानाची क्रेझ

पर्यटक गेल्या काही वर्षांत अधिक जागरूक झाले आहेत. शाळेच्या सुरुवातीलाच पालकांना वर्षभराचे कॅलेंडर मिळत असल्याने पालक मोठ्या सुट्ट्यांचे नियोजन दोन ते तीन महिने आधीच करतात. लवकर बुकिंग केल्यास विमान प्रवास परवडतो आहे. त्यामुळे वेळेची बचत करण्यासाठी, मुलांना हटके अनुभव मिळावा यासाठी पर्यटकांमध्ये विमान प्रवासाची क्रेझ आहे. चार ते पाच महिने आधीच विमानाचे बुकिंग केले जात आहे, तर काही पर्यटक एक वेळ रेल्वे आणि एक वेळ विमान प्रवास असे नियोजन करतात.

स्वस्त अन् मस्त परदेशवारी

आवाक्यात आलेला विमान प्रवास आणि इंटरनेटमुळे जगभरातील पर्यटनस्थळांची सखोल माहिती सहज उपलब्ध झाल्यामुळे पर्यटकांमध्ये परदेश सहलींबाबत उत्सुकता वाढली आहे. देशांतर्गत आठ दिवस

सहलीचा खर्च आणि चार दिवसाची परदेश सहल तेवढ्याच किमतीत होत असल्याने पर्यटक परदेश सहलीला प्राधान्य देत आहेत. इस बार कुछ बडा हो जाये ही पर्यटकांची मानसिकता आहे. त्यामुळे छोट्या सुट्टीत मोठा पल्ला गाठण्याची स्वप्न पर्यटक बघत आहेत. परदेशी सहलींमध्ये प्रामुख्याने दक्षिण आशियाई देशांना सर्वाधिक पसंती आहे. एकाच सहलीत संपूर्ण युरोप कुटुंबाला परवडत नसल्याने अनेक लोक टप्पाटप्याने दोन-ते तीन देश फिरण्याचेही नियोजन करीत आहेत. एका खासगी सर्वेक्षणानुसार उन्हाळी सुट्ट्यांसाठी परदेशात जाणाऱ्या पर्यटकांची संख्या २३ टक्क्यांनी वाढली आहे.

जम्मू-काश्मीरला पर्यायच नाही

उन्हाळी सुट्टीत राज्यांतर्गत पर्यटनासाठी या वर्षीदेखील जम्मू-काश्मीरला सर्वाधिक प्राधान्य मिळते आहे. उकाड्यापासून वाचण्यासाठी पर्यटकांनी थंड हवेची ठिकाणे निवडली आहेत. यामध्ये जम्मू काश्मीर, अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल, मेघालय या लांब पल्ल्याच्या सहलीचे नियोजन केले आहे. गोवा, केरळ, कर्नाटकमधील लोकप्रिय थंड हवेची ठिकाणेदेखील यंदा चलतीत आहेत. काश्मीरमधील पर्यटन वाढविण्यासाठी या वर्षी तेथील पर्यटन मंत्रालयाने महाराष्ट्रातील पर्यटकांसाठी विशेष आकर्षक योजनाही जाहीर केल्या आहेत.

- कितीही ऊन असले, तरी कोकणावर जीवापाड प्रेम करणाऱ्या मंडळींना मोठ्या सुट्टीत कोकणात गेल्याशिवाय करमत नाही. यंदाही कोकण किनारपट्टीवरील तारकर्ली, वेंगुर्ला, देवबाग, अलिबाग, हरिहरेश्वर, वेळणेश्वर, गणपतीपुळे, दिवेआगार, गुहागर या ठिकाणी तसेच महाबळेश्वर, भंडारदरा, माथेरान, आंबोली या थंड हवेच्या ठिकाणीही पर्यटक बुकिंग करत आहेत. पर्यटनाचा हंगाम असल्याने बुकिंगचे दर वाढले आहेत.

ही घ्या काळजी...

- आकर्षक फोटो आणि पॅकेजच्या प्रलोभनाला बळी पडू नका.
- मोठ्या सहलीचे बुकिंग करताना कंपनीची प्राथमिक माहिती घ्या.
- ट्रॅव्हल कंपनीचे किती कर्मचारी सहलीदरम्यान बरोबर येणार हे जाणून घ्या.
- बुकिंग फॉर्ममधील अटी आणि नियम बारकाईने वाचून घ्या.
- प्रवासाच्या तारखा, तिकिटे आणि विमान प्रवासाच्या वेळा बारकाईने वाचून घ्या.
- इंटरनेटवरून हॉटेल बुकिंग केल्यावर ई-मेल आला, तरी एकदा संबंधित हॉटेलशी दूरध्वनीवरूनही संपर्क साधा.
- प्रवासाशी निगडित सर्व कागदपत्रे आणि बिलांच्या पावत्या जपून ठेवा.
- आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तातडीने काय करावे, याची माहिती जाणून घ्या.
- परदेश सहलीसाठी पासपोर्ट, व्हिसा, सामानाची मर्यादा, हवामान याची सर्वंकष माहिती असली पाहिजे.

लोकप्रिय पर्यटन स्थळे

- राज्यात : महाबळेश्वर, पाचगणी, लोणावळा, खंडाळा, माथेरान, तोरणमाळ, चिखलदरा, आंबोली, भंडारदरा, कोयनानगर, जव्हार, पन्हाळा- आंबा, राधानगरी आणि रत्नागिरी, सिंधुदुर्गातील सागरी किनारे.
- देशात : जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, नेपाळ, सिक्कीम, पश्चिम बंगाल, अरुणाचल प्रदेश (तवांग), तमिळनाडू (उटी), हिमाचल प्रदेश, मेघालय (शिलाँग, चेरापुंजी), केरळ (मुन्नार, वायनाड), आंध्र प्रदेश (हेर्सले हिल्स), लक्षद्वीप बेटांचा समूह.

जलदुर्गावरील निसर्गाचे पर्यटन

गड-किल्ले हे महाराष्ट्राचं एक अनोखं भूषण व अमूल्य ठेवा आहे, हे आपण जाणतोच. सुमारे ४०० किल्ल्यांच्या अस्तित्वामुळे महाराष्ट्र संपूर्ण देशात याबाबतीत प्रथम क्रमांकावर आहे. शिवरायांच्या स्फूर्तिदायी आणि विजयी इतिहासाचे महाराष्ट्रातील बरेच किल्ले साक्षीदार आहेत. आज ऐतिहासिक, पर्यटन-विषयक आणि वास्तुशास्त्रीय अशा विविध अंगी आपल्या किल्ल्यांचं महत्त्व निर्विवाद आहे. कोकणातील सिंधुदुर्गपासून विदर्भातील गाविलगडपर्यंत, खानदेश सीमेवरील साल्हेरपासून दक्षिण महाराष्ट्रातील पन्हाळगडपर्यंत आमि मराठवाड्यात नळदुर्गपासून देवगिरीपर्यंत हे दुर्गरूपी शिलेदार आजही दिमाखाने उभे आहेत. शिवाजी महाराज हे मध्ययुगीन भारतातील पहिलेच राजे होते, ज्यांनी सागरी सामर्थ्यांचं महत्त्व जाणलं आणि इथे आपल्या जलदुर्गांची कहाणी सुरू होते!

सागरी किल्ल्यांच्या तत्कालीन सामरिक माहात्म्याबद्दल आपण इतिहास वाचला आहेच. आज या जलदुर्गावरील व आसपासच्या समृद्ध निसर्गाबद्दल आणि पर्यावरणीय महत्वाबद्दल आपण जाणून घेऊ. वनस्पती, पक्षी, प्राणी आणि जलचर अशा सर्व प्रकारच्या जैवविविधतेने जलदुर्गांचे परिसर आणि संपूर्ण कोकण किनारा संपन्न आहे. तेथील निसर्ग संपत्तीचं महत्त्व नीट समजून घ्यायचं असेल तर संपूर्ण परिसराचा एकत्रित आढावा घ्यावा लागेल.

वनस्पतींचं भांडार

जलदुर्गावर आणि त्यांच्या आसपास भूमीवरील, किनारी तसेच सागरी वनस्पतीचं जणू भांडारच आहे. कोकणातील भूमीवरील आंबा, फणस, जांभूळ, काजू, ताड, नार आणि करवंद अशा मधुर फळे देणाऱ्या झाडांबरोबरच भेंड, पिंपळ, वड, उंबर, उंडी, सावर, कराई, चाफा, बोलींमाड, सुरू, साग, घाणेरी आणि रुई अशा विविध वनस्पती आणि वृक्ष यांनी आपले जलदुर्ग आणि लगतचे परिसर सजलेले आहेत. अनेक किल्ल्यांवरील तळ्यात आणि खडकांवर उगवलेले शेवाळ, तसेच निरनिराळ्या प्रकारचे गवत आणि नेचेसुद्धा आपले लक्ष वेधून घेतात. काही किल्ल्यांवर निवडुंग उगवलेले दिसते. किनाऱ्याला असलेल्या जलदुर्गावर तर विविध वृक्ष सर्रास आढळतातच, परंतु सिधुदुर्ग किंवा जंजिरासारख्या पाण्याने वेढलेल्या किल्ल्यांवर सुद्धा पक्ष्यांच्या विष्ठेतून पडलेल्या बिया किंवा माणसांनी केलेली लागवड यामुळे यातील अनेक वृक्ष सापडतात. मुंबईतील शिवडीच्या किल्ल्यावरील उंडीची झाडे आणि सिंधुदुर्गावरील विपुल संख्येने असलेली नारळाची झाडे लगेच लक्षात येतात. वसईच्या किल्ल्यातील नारळ आणि ताडाची गर्द राई तर एखाद्या घनदाट जंगलाचा आभास निर्माण करते! किनारी वनस्पतीमध्ये खारफुटी अथवा सुंद्रीची वने आणि त्यांच्याशी निगडित इतर कुळातील झाडं अतिशय महत्त्वाची आहेत. कोकण किनाऱ्यावर, विशेषतः खाड्या व नद्यांच्या मुखाशी, खारफुटी अजूनही अनेक ठिकाणी समृद्ध आहे. वसई, गोपाळगड, जयगड व विजयदुर्ग किल्ल्यांच्या लगतच्या खाडी किनाऱ्यांवर विस्तृत प्रदेशावर खारफुटीची जंगले आहेत. लाटा व वाऱ्यापासून किनाऱ्याचे रक्षण, माशांची पैदास होण्याचं ठिकाण आणि पक्षी व उभयचर जीवांचा अधिवास अशी खारफुटीच्या उपयोगांची यादी न संपणारी आहे. खारफुटीच्या पुढे समुद्राच्या बाजूला अनेक ठिकाणी चिखलाची मैदाने व त्यापुढील उथळ समुद्रात विविध प्रकारच्या सागरी पाणवनस्पती विपुल प्रमाणात आढळतात, ज्यावर असंख्य जलचर आणि पक्षी पोसले जातात.

पक्ष्यांचे नंदनवन

जंगलं, खारफुटी आणि समुद्र किनारे अशा विविध अधिवासांमध्ये राहणाऱ्या असंख्य पक्ष्यांचे वास्तव्य जलदुर्ग व त्यांच्या आसपास दिसून येतं. किल्ला किनाऱ्याला लागून असो किंवा पाण्याने वेढलेला असो. पक्ष्यांना अन्न किंवा निवाऱ्याच्या शोधात तिथे विनासायास जाता येते. टिटवी, कोकीळ, पाकोळी, घार, ब्राह्मणी घार, पोपट, साळुंकी, कावळा, कबूतर, कवडा, चिमणी, कोतवाल आणि भिंगरी यासारखे पक्षिगण जलदुर्गावर अनेकवेळा दिसतात. सिंधुदुर्ग किल्ल्यावरील मधल्या झुडपी गवताळ मैदानात लाल गालाच्या टिटव्या नेहमीच आपल्या कलकलाटाने आपलं लक्ष वेधून घेतात. मोटरबोटने किल्ल्यावर जाताना मला एकदा इजिप्शियन गिधाड दिसले होते. त्याशिवाय जलदुर्गाच्या आसपासच्या रानात सातभाई, शामा, दयाळ, करडा धनेश, मलबार धनेश, थोरला धनेश, मक्षीखाऊ, स्वर्गीय नर्तक, हळद्या, गव्हाणी घुबड, शिक्रा आणि सर्पगरूड यासारखे असंख्य पक्षी दिसतात, तर आसपासच्या गवताळ भागात किंवा सडयांवर रातवा, नीळपंख, मुनिया व गप्पीदास यासारखे पक्षी दिसतात. शिवडी किल्ल्यावरून समोरील चिखलाच्या मैदानावर रोहित (फ्लॅमिंगो) हजारोंच्या संख्येने थंडीत दिसतात. संपूर्ण किनारपट्टीवरील चिखलाच्या मैदानावर व खारफुटी वनांमध्ये (जी अनेक ठिकाणी जलदुर्गाना लागूनच आहेत) रोहित व्यतिरिक्त शेकाट्या, बगळा, वंचक, रात्रवंचक, समुद्रपक्षी, सुरय आणि खंडया यांच्या विविध जाती सहज दिसतात. त्याचप्रमाणे कुलाबा आणि जंजिरासारख्या जलदुगारंच्या आजूबाजूला जे समुद्र किनारे आहेत, तेसुद्धा स्थानिक व स्थलांतरित पक्ष्यांचे अधिवास आहेत.

वन्य प्राण्यांचा आढळ



आज सर्वत्र वन्य प्राणी आणि त्यांचे अधिवास नष्ट होत आहेत आणि कोकणही त्याला अपवाद नाही. परंतु, डोंगर-दऱ्या प्रमाणेच जलदुर्ग आणि आसपासचे सडे, खाड्या व रानांमध्येसुद्धा प्राण्यांचे अस्तित्व दिसते. अगदी चिमुकल्या खारीपासून ते बिबट्यापर्यंत अनेक प्राणी आपली हजेरी लाऊन जातात. रानडुक्कर, दख्खनी माकड, मुंगुस, वटवाघूळ, ससा, रानउंदीर, रानमांजर आणि भेकर हे वन्यजीव जलदुर्गाच्या आसपास असल्याच्या नोंदी आहेत. जलदुर्गाच्या आसपासच्या खाड्या व नद्यांमध्ये पाणमांजर मोठ्या संख्येने वस्ती करून आहेत. काही अभ्यासकांनी विजयदुर्गजवळ बिबट्या पाहिलाय, तर या सर्वाहून विशेष म्हणजे रत्नागिरी आणि जयगड यामधील किनारी पट्ट्यात काहींनी अलीकडेच चक्क गवा पाहिला. हा महाकाय प्राणी साधारणतः सह्याद्रीलगतच्या कोकणातील तालुक्यांमध्ये सापडतो. परंतु, असे अपवाद अधूनमधून दिसतात. गोपाळगडच्या अलीकडच्या गुहागर तालुक्यातील रानातसुद्धा गवे दिसल्याच्या नोंदी आहेत. सिंधुदुर्ग किल्ल्यापासून काही कि.मी. अंतरावरील घामापूर तलाव व नेरूरपार परिसरात गेल्याच वर्षी तिल्लारी भागातले हत्ती येऊन गेल्याची हकीकत स्थानिक सांगतात.

चहा निर्यातीत भारत बनला जगातील दुसरा सर्वात मोठा देश

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) – भारताने २०२४ मध्ये २५५ दशलक्ष किलो चहाची निर्यात केली आहे. यासह भारत श्रीलंकेला मागे टाकून जगातील दुसरा सर्वात मोठा चहा निर्यातदार बनला आहे. या क्रमवारीत केनियाने आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. भू-राजकीय तणावामुळे जागतिक बाजारपेठेत अनिश्चितता असूनही, भारताची चहाची निर्यात २०२४ मध्ये २५५ दशलक्ष किलोग्रॅमपर्यंत पोहोचेल, जी १० वर्षातील उच्चांकी आहे. २०२३ मध्ये नोंदवलेल्या २३१.६९ दशलक्ष किलोग्रॅमच्या याच आकड्यावरून २०२४ मध्ये देशाच्या निर्यातीत १० टक्के वाढ झाली आहे.

भारताच्या निर्यातीचे मूल्य २०२३ मधील ६,१६१ कोटी रुपयांवरुन २०२४ मध्ये ७,१११ कोटी रुपयांपर्यंत १५ टक्क्यांनी वाढले आहे. इराकमध्ये शिपमेंटमध्ये जोरदार वाढ झाली आहे, ज्याचा वाटा २० टक्के चहा निर्यातीत आहे. या आर्थिक वर्षात व्यापाऱ्यांनी पश्चिम आशियाई देशात ४०-५० दशलक्ष किलोग्राम चहा पाठवण्याची अपेक्षा आहे.

ते म्हणाले की, श्रीलंकेचे पीक घटले तेव्हा पश्चिम आशियातील अनेक बाजारपेठांमध्ये प्रवेश करणाऱ्या भारतीय निर्यातदारांनी तेथे माल पाठवण्याचे प्रमाण राखले आहे. जाणून घेऊयात याबाबतची सविस्तर माहिती.

अमेरिका आणि ब्रिटन प्रमुख बाजारपेठ

भारत २५ हून अधिक देशांमध्ये चहाची निर्यात करतो, त्यापैकी णए, इराक, इराण, रशिया, णड आणि णघ ही त्याची प्रमुख बाजारपेठ आहेत. भारत हा जगातील पहिल्या पाच चहा निर्यातदारांपैकी एक आहे. जो एकूण जागतिक निर्यातीपैकी १० टक्के आहे. भारतातील आसाम, दार्जिलिंग आणि निलगिरी चहा हे जगातील सर्वोत्तम चहा मानले जातात. भारतातून निर्यात होणारा बहुतांश चहा 'ब्लॅक टी' (काळा चहा) आहे, जो एकूण निर्यातीच्या सुमारे ९६ टक्के आहे.

इतर प्रकारांमध्ये नियमित चहा, ग्रीन टी, हर्बल टी, मसाला चहा आणि लिंबू चहा यांचा समावेश होतो. चहा उत्पादनाला चालना देण्यासाठी, भारतीय चहासाठी एक विशिष्ट ब्रँड तयार करण्यासाठी आणि चहा उद्योगाशी संबंधित कुटुंबांचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठी भारताने अनेक पावले उचलली आहेत. आसाम व्हॅली आणि कचार हे आसामचे दोन चहा उत्पादक प्रदेश आहेत. पश्चिम बंगालमध्ये डूअर्स, तराई आणि दार्जिलिंग हे तीन प्रमुख चहा उत्पादक प्रदेश आहेत.

दीड लाख रुपयांची लाच घेताना जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे जाळ्यात

परभणी (प्रतिनिधी) – राज्यात गेल्या काही महिन्यात एसीबी म्हणजे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाईचा धडाका लावला असून अनेक सरकारी कर्मचारी, अधिकारी जाळ्यात अडकल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामध्ये, पोलीस, वन, महसूल विभागासह विविध शासकीय विभागातील अधिकाऱ्यांचा उल्लेख आहे. त्यात, महिला अधिकारी, कर्मचारीही आहेत. आता, परभणी जिल्ह्यातील एसीबीकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे एसीबीच्या जाळ्यात अडकल्या आहेत. स्विमिंग पूल बांधण्यास परवानगी देण्यासाठी कविता नावंदे यांनी अडीच लाख रुपयांची लाच मागितली होती. त्यातील, दीड लाखांची लाच घेताना रंगेहात पकडले आहे.

परभणी जिल्ह्यातील क्रीडा विभागात लाचप्रकरणामुळे खळबळ उडाली आहे. एका क्रीडा स्पर्धेचे बिल आणि स्विमिंग पुल मान्यतेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे यांनी लाच मागितली होती. कविता यांनी या मंजुरीसाठी संबंधितांकडे अडीच लाख रुपयांची लाच मागितली होती, ज्यात दीड लाख रुपये स्वीकारताना त्यांना एसीबीच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले आहे. परभणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईमुळे जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला पेन्शनसाठी मागितलेले पैसे असो की, क्रीडा कर्मचाऱ्यालाही क्रीडा स्पर्धेचे

बील काढण्यासाठी मागितलेली पैसे असो अशा अनेक आर्थिक गैर व्यवहाराचे आरोप त्यातच नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदारांनी लावलेली लक्षवेधी चर्चेत असतानाच परभणीच्या जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे यांना तब्बल दीड लाखांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले आहे.

मानवत येथील एका तक्रारदाराला तिथल्या क्रीडा स्पर्धेचे बिल तसेच स्विमिंग पूलचं मान्यता देण्यासाठी कविता नावंदे यांनी अडीच लाखांची लाच मागितली होती. त्यातील एक लाख रुपये पहिल्यांदाच त्यांनी स्वीकारले होते. त्यानंतर ही रक्कम द्यायची नव्हती. त्यामुळे या तक्रारदाराने परभणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्या अनुषंगाने या तक्रारीची पडताळणी करण्यात आली आणि गुरुवारी सापळा रचून दीड लाख रुपये स्वीकारताना कविता नावंदे यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. सध्या त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयामध्ये नेण्यात आले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया ही सुरू आहे.

'एआय'च्या मदतीने क्षयरोगाचे निदान, गडचिरोलीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

गडचिरोली (प्रतिनिधी) – गडचिरोलीसारख्या आदिवासीबहुल जिल्ह्यात क्षयरोग आणि फुफ्फुसांशी संबंधित विविध आजारांचे निदान करण्यासाठी डॉ. अभय बंग यांच्या 'सर्च' संस्थेद्वारा संचालित माँ दंतेश्वरी हॉस्पिटलमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. एआय तंत्रज्ञानाद्वारे २०२४-२०२५ या वर्षात माँ दंतेश्वरी हॉस्पिटलने ८८ क्षय रुग्णांचे निदान केले.

माँ दंतेश्वरी हॉस्पिटलमध्ये फुफ्फुसांशी संबंधित काही आजारांचे निदान करण्यासाठी 'एआय'चा प्रभावीपणे वापर केला जात आहे. २०२३ पासून ही यंत्रणा वापरली जात आहे.

'क्युअर एआय' या कंपनीने हे तंत्रज्ञान विकसित केले आहे. २०२४-२५ या वर्षात या हॉस्पिटलद्वारे ८८ क्षयरुग्णांचे निदान झाले आहे. एखाद्या रुग्णाच्या फुफ्फुसाचा एक्सरे घेतल्यानंतर तो 'क्युअर एआय'च्या सॉफ्टवेअरवर अपलोड होतो. त्यानंतर या रुग्णाला क्षयरोग, बरगडी फ्रॅक्चर, शरीरातील सुक्ष्मदर्शक आजार, शरीरात पाण्याची कमी असण्याचा धोका किती आहे, याचा अंदाज वर्तवला जातो. रुग्णाचा अहवाल काही सेकंदात डॉक्टरांना त्यांच्या मोबाईल ॲपवर मिळतो. त्यामुळे पुढील उपचार तसेच आवश्यक त्या चाचण्या घेण्यासाठीचा निर्णय लगेच घेता येतो. डेटा हा कोणल्याही 'एआय'च्या केंद्रस्थानी असतो. हे तंत्रज्ञान विकसित करतानाही संबंधित कंपनीने फार मोठ्या प्रमाणावर मेडिकल इमेजेस वापरल्या आहेत. मेडिकल इमेजमध्ये एक्सरे, एमआरआय आदींचा समावेश होतो.

सप्लिमेंट्स घेतल्याने तरूणास किडनीचा विकार

मुंबई (प्रतिनिधी) – शरीरयष्टी पिळदार करण्यासाठी अनेक तरुण सप्लिमेंट्स घेण्याला प्राधान्य देतात. मात्र अनियंत्रित सप्लिमेंट्स घेतल्याने मूत्रपिंडावर (किडनी) परिणाम होत असल्याचे प्रकार मागील काही दिवसांपासून वाढले आहेत. अशाच प्रकारे अनियंत्रित सप्लिमेंट्स घेणाऱ्या एका २७ वर्षीय तरुणाच्या मूत्रपिंडावर परिणाम झाला, मात्र मुंबईतील डॉक्टरांनी यावर तातडीने उपचार केल्याने या तरुणाचे प्राण वाचले. मुंबईतील २७ वर्षीय तरुणाला काही दिवसांपूर्वी अचानक मूत्रपिंडाचा त्रास सुरू झाला.

जिंदाल स्टेनलेस महाराष्ट्रात ४२ हजार ८८६ कोटींची गुंतवणूक करणार

मुंबई (प्रतिनिधी)- जिंदाल स्टेनलेस लिमिटेड महाराष्ट्रात ४२ हजार ८८६ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा प्रकल्प उभा करणार आहे. यातून सुमारे साडे पंधरा हजार रोजगार संधी उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

जिंदाल स्टेनलेस लिमिटेडचे अध्यक्ष रतन जिंदाल यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांची 'सागर' या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत जिंदाल यांनी या प्रकल्पाच्या उभारणीचा प्रस्ताव सादर केला. या प्रकल्पाची उत्पादन क्षमता वार्षिक चार दशलक्ष टन इतकी असणार आहे. या उद्योग समुहाने आणि जिंदाल यांनी महाराष्ट्राच्या क्षमतेवर दाखविलेला विश्वास महत्वाचा आहे. त्यामुळे या प्रकल्पाकरिता सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी या भेटी दरम्यान झालेल्या चर्चेत नमूद केले.

ऑफर ऑफर A/C ऑफर
म हा रा ष्ट्र जेन्टस् ब्युटी सलुन
फेशियल
१) गोल्ड फेशियल 499/-
२) VLCC फेशियल 499/-
३) डायमंड फेशियल 599/-
डी-टॅन
१) O3+ 349/-
२) रागा 299/
ब्लीच
१) ऑक्सी ब्लीच 299/-
२) ओलिविया ब्लीच 299/-
कलर
१) लोरियल 299/-
२) मॅट्रिक्स 299/-
३) रागा 249/-
४) गार्नियर 199/-
हेयर स्पा
१) लोरियल 249/-
२) मॅट्रिक्स 249/-
हॉटेल मंजू समोर, वजिराबाद, नांदेड. 9822972221

CONSULTING PHYSIOTHERAPIST
कन्सल्टिंग फिजिओथेरपीस्ट
डॉ.ईश्वर जी. हिंगोलीकर (PT) (B.P. Th)
उपलब्ध सुविधा
• कपिंग थेरपी (गोल्ड मेडलिस्ट) • ड्राय नीडलींग थेरपीस्ट
• ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन • टेपींग थेरपीस्ट
• न्यूरो रिहॅबिलिटेशन
नांदेड
होम व्हिजीट उपलब्ध 9657631231

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे
डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.
संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

Change In Name

My Old Name is SHYAMSUNDAR SHIVAJIRAO KULKARNI which now I am changing as New Name SHYAMSUNDAR SHIVAJI ASHTURKARHenceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same ADD- AT POST NO 15 JIJAU NAGAR WADI BK PURANA ROAD NANDED DARYAPUR WADI BK NANDED 431605 MAHARASHTRA MO.9823382890

Change In Name

My Old Name is ASHISHKUMAR JAIKUMAR BAKLIWAL which now I am changing as New Name ASHISH JAIKUMAR BAKLIWAL Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same SIGN BY- ASHISH JAIKUMAR BAKLIWAL AASRA 304 BHALCHANDR MENSSION NEAR JALARAM TEMPLE DILIP SINGH COLONY POST VAZIRABAD NANDED 431601 MO.9325871999

Change In Name

My old name is UMAKANT KISHANRAO DHUDHAMBE. I AM changing AS New Name. UMAKANT KISHANRAO DUDHAMBE Hence forth her all correspondence will be done As per her new Neme please consider the same. At. Near narhar maharaj Mandir cidco New Nanded ND 2. 3/7 cidco - 431603 mo 9921814208

Change In Name

I DECLARE THAT MY MINOR SON OLD NAME IS AARAV ASHISHKUMAR BAKLIWAL WHICH NOW I AM CHANGING AS MY MINOR SON NEW NAME AARAV ASHISH BAKLIWAL Henceforth My SON All Correspondence will be done as per my MINOR SON new name. Please consider the same. SIGN BY- ASHISH JAIKUMAR BAKLIWAL AASRA 304 BHALCHANDR MENSSION NEAR JALARAM TEMPLE DILIP SINGH COLONY POST VAZIRABAD NANDED 431601 MO.9325871999

Change In Name

I MOHAMMAD FAIZAN S/O RIYAJ SHAIKH HOLDER OF INDIAN PASSPORT NO R 8615839 ISSUED IN PUNE ON 12/1/2018 I AM PERMANENT RESIDENT OF H.NO.9-7-48 A-10 HYDER BAGH NO 1 DEGLOOR NAKA NANDED 431603 MAHARASHTRA INDIA

I DO HEAR BY DECLARE CORRECTION OF SPELLING IN MY NAME FROM MOHAMMAD FAIZAN RIYAJ SHAIKH TO MOHAMMAD FAIZAN RIYAJ SHAIKH WITH IMMEDIATE EFFECT

Change In Name

I SAFIHA FATEEMA D/O RIYAZ SHAIKH HOLDER OF INDIAN PASSPORT NO R 8615503 ISSUED IN PUNE ON 12/1/2018 I AM PERMANENT RESIDENT OF H.NO.9-7-48 A-10 HYDER BAGH NO 1 DEGLOOR NAKA NANDED 431603 MAHARASHTRA INDIA

I DO HEAR BY DECLARE CORRECTION OF SPELLING IN MY NAME FROM SAFIHA FATEEMA D/O RIYAZ SHAIKH TO SAFIHA FATEEMA D/O RIYAJ SHAIKH & MY DATE OF BIRTH AS 31/8/2012 INSTEAD OF 30/8/2012 WITH IMMEDIATE EFFECT

जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर बिलोली यांच्या न्यायालयात,किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७५ /२०२५

पु.ता.२८/४/२०२५

अर्जदार-१.गंगाधर पोशट्टी गौतमवार , वय-५५ वर्षे, व्यवसाय मजुरी रा.कांगठी ता.बिलोली जि.नांदेड

विरुध्द -

गैरअर्जदार - निरंक

विषय - वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला असून अर्जदाराचे असे कथन आहे की, मयत अर्जदार हा मयत परशुराम पोशट्टी गौतमवार यांचा कायदेशीर वारस आहे.मयत परशुराम पोशट्टी गौतमवार यांचा अर्जदार हा भाऊ आहे. मयत परशुराम पोशट्टी गौतमवार यांचा मृत्यू दिनांक १५/१२/२०२४ रोजी झाला. मयत परशुराम पोशट्टी गौतमवार यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदारांनी न्यायालयात सदर मयतांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत ३० दिवसात या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.आज दि.२६ मार्च, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

आदेशावरून

क.लिपीक सहा.अधिक्षक

सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली

जाहीर प्रगटन

(भोकर येथील श्री.डी.डी.माने सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर भोकर दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६९/२०२५

अर्जदार-१. सागरबाई भ्र.कामाजी तोटेवाड ,वय - ५२ वर्षे, व्यवसाय- घरकाम.व शेती २.ओमकार पि.कामाजी तोटेवाड वय २६ वर्षे व्यवसाय- शेती ३.सुरेंद्र पि.कामाजी तोटेवाड वय २९ वर्षे व्यवसाय-शेती सर्व रा. थेरबन ता. भोकर जि. नांदेड. ४. प्रियंका भ्र.मारोती पेंटवाड, वय - ३२ वर्षे, व्यवसाय- घरकाम, रा.ब्राम्हणगाव उमरी ता.उमरखेड जि. यवतमाळ. ५.श्रद्धा भ्र.बालाजी पुज्जरवाड , वय- २८ वर्षे, व्यवसाय- घरकाम, रा. जिंदमनगर गोपाळचावडी नांदेड कौठा ता.जि.नांदेड

विरूध्द

गैरअर्जदार -निरंक

विषय-कलम ०३ मुंबई रेग्युलेशन VIII १८२७ कायद्याप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत...

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिवाणी किरकोळ अर्ज केला आहे की, मयत हे अर्जदार क. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील आहेत.मयत कामाजी पि.मारोती तोटेवाड हे दिनांक १८/३/२०२४ रोजी सरकारी दवाखाना विष्णूपुरी नांदेड ता.जि.नांदेडयेथे मयत झाले. अर्जदार हेच मयत कामाजी पि.मारोती तोटेवाड यांचे कायदेशीर वारस आहेत असे वारसांचे म्हणणे आहे.

मयत कामाजी पि.मारोती तोटेवाड यांचे अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.अर्जदार यांना मयताच्या मृत्यू प श्चात विविध शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी वारसा हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

हे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा उजर अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. अन्यथा त्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही, असे समजुन अर्जदारातर्फे एकतर्फी निर्णय दिला जाईल. याची नोंद घ्यावी.आज दिनांक २४ मार्च २०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर भोकर

जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर बिलोली यांच्या न्यायालयात,किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७८ /२०२५

पु.ता.५/५/२०२५

अर्जदार-१.आनंदा पि.सरस्वतीराव देगलूरे,वय-५० वर्षे, व्यवसाय- शेती रा.गुजरी ता.बिलोली जि.नांदेड २.साईनाथ पि.आनंदराव देगलूरे वय ३७ वर्षे व्यवसाय शेती रा.गुजरी ता.बिलोली जि.नांदेड ३.सविता भ्र.रमेश कडाळे वय ३५ वर्षे व्यवसाय - घरकाम रा.नागणी पो.हुनगुंदा. ता.बिलोली जि.नांदेड ४.उषा भ्र.गजानन पाटील वय ३१ वर्षे व्यवसाय- घरकाम रा.बेटमोगरा ता.मुखेड जि.नांदेड

विरुध्द -

गैरअर्जदार - निरंक

विषय - वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला असून अर्जदाराचे असे कथन आहे की, मयत अर्जदार क्रमांक १ ते ४ हे मयत कुसुमबाई आनंदराव देगलुरे यांचा कायदेशीर वारस आहे.मयत कुसुमबाई आनंदराव देगलुरे यांची अर्जदार क्र. १ ह पती आहे. अर्जदार क्रमांक १ हे अर्जदार क्रमांक २ ते ४ यांचे वडील आहेत. मयत कुसुमबाई आनंदराव देगलुरे यांचा मृत्यू दिनांक २२/१२/२०२४ रोजी झाला. अर्जदार क्रमांक १ ते ४ यांना मयत कुसुमबाई आनंदराव देगलुरे यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदारांनी न्यायालयात सदर मयतांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत ३० दिवसात या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.आज दि.२६ मार्च, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

आदेशावरून

क.लिपीक सहा.अधिक्षक

सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली

जाहीर प्रगटन

मौजे वाडी बु ता.जि.नांदेड हद्दीतील शेत सर्व्हे गट नंबर ३३ मधील प्लॉट नंबर ४९ साईज १८०० चौरस मीटर विजयसिंह पि.रामकिशनसिंह ठाकूर यांचेकडून प्रतिभा बाबा रूंजकर रा.आंबेडकरनगर नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चर्तुसिमा पुढील प्रमाणे-पुर्वेस-सर्व्हे नंबर ३३ चा भाग, पश्चिमेस -२० फुट रूंद रोड,दक्षिणेस- २० फुट रूंद रोड, उत्तरेस-प्लॉट नंबर ५०.

तरी वरील चर्तुसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क,उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा.मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदी खत करून येईल. करीता हे जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटन देणार
प्रतिभा बाबा रूंजकर
रा.आंबेडकर नगर नांदेड
मो.९७६६५५२६५७

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, शेख तय्यब शेख इस्माईल (गहाणखत करुन देणार) खालील परिशिष्टातील स्थावर मालमत्तेचे गहाणखत करुन देण्याचे योजीले असून जे की, मौजे नसरतपुर, हसापूर ता. जि. नांदेड येथील सर्व नं. २० पैकी एक प्लॉट नं. ५७ चा पुर्वे कडील भाग आहे. ज्याची एकुण लांबी व रुंदी पुढीलप्रमाणे आहे. पुर्वे कडील बाजु ३३ फुट ६ इंच म्हणजे १०.२१ मी. आहे. पश्चिमेकडील बाजु ३० फुट म्हणजे ९.१४ मी. आहे. दक्षिणेकडील बाजु १८ फुट म्हणजे ५.४८ मी. आहे उत्तरेकडील बाजु ३ फुट ३ इंच म्हणजे ०.९९ मी. आहे ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३१८.७५ चौ. फुट म्हणजे २९.६२ चौ.मी. आहे. ज्याच्या चतु:सिमा पुढील प्रमाणे आहेत. पुर्वेस २० फुट रुद रोड, पश्चिमेस सदरील प्लॉटचा उर्वरीत भाग, दक्षिणेस- १५ फुट रुंद रोड, उत्तरेस प्लॉट नं. ५० चा भाग, सदरील मालमत्ता शेख तय्यब शेख इस्माईल हे माझे पक्षकार निवास हाऊसिंग फायनान्स प्रायवेट लिमिटेड शाखा नांदेड यांच्या हक्कात गहाणखत करणार आहेत.

गहाणखत करुन देणार शेख तय्यब शेख इस्माईल यांचे मुळ विक्रीखत क्र. २८७/२०१७ दि.१८.०१.२०१७ मध्ये एकुण पृष्ठांची संख्या १६ असून त्यामधील पान क्र. ११ आणि १२ हे गहाळ झाले आहेत. त्यामुळे गहाणखत करुन देणार शेख तय्यब शेख इस्माईल यांच्या वर नमुद मालमत्तेबाबत काही वाद किंवा न्यायालयात प्रलंबीत प्रकरण असल्यास त्याबद्दलचा आक्षेप वा उजर हितसंबंध व्यक्तीनी दाखल करावे. त्यामुळे सदरील जाहीर प्रगटन देत आहे की, वरील स्थावर मिळकती बाबत कुठल्याही प्रकारचे हक्क जसे की खरेदी अदलाबदल, गहाण (नोंदणीकृत / संमीक बंधक इ.). बक्षीस, वारसा, कौटुंबीक व्यवस्था, पोटगी, हिस्सेदारी, ताबा, परवाना, भाडे तत्वावर, भाडे पट्टा, धारण, अधिकार, सुखवाद, प्रतिज्ञा, बेबंद इत्यादी किंवा या व्यतिरिक्त इतर कोणत्याही संदर्भात कोणाचेही हक्क गुंतलेले असतील अशा व्यक्तींनी त्यांच्याकडील असणाऱ्या संपुर्ण मुळ कागदोपत्री पुराव्यासहीत माझ्याकडे लेखी निवेदन ०७ दिवसाच्या आत सादर करावे अशी विनंती करण्यात येत आहे. जर ०७ दिवसाच्या आत सदरील लेखी आक्षेप प्राप्त न झाल्यास माझे अशील शेख तय्यब शेख इस्माईल हे सदरील वर नमुद मालमत्ता निवास हाऊसिंग फायनान्स प्रायवेट लिमिटेड शाखा नांदेड यांच्या हक्कात गहाणखत करुन देतील याची नोंद घ्यावी.

करीता हे जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटन देणार
निवास हाउसिंग फायनंन्स
लिमिटेड शाखा नांदेड

मार्फत
ॲड.आर.सी.पाडमुख
घर क्र.२७५/२१,
लेबर कॉलनी
नांदेड मो.९०६७३४२९१४

जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७९/२०२५ अमीनाबी विरुध्द निरंक

अर्जदार :-१अमीनाबी इलाही सय्यद, वय-४० वर्षे, रा.कौठा ता.बिलोली जि.नांदेड

विरूध्द निरंक

विषय : वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत शेख बानुबी खासीमसाब यांचे अर्जदार ही मुलगी आहे.मयत हे कौठा ता.बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी होते. मयत शेख बानुबी खासीमसाब यांचा मृत्यु दि.१९/३/२०२२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मयताच्या पश्चात मयताचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत शेख बानुबी खासीमसाब यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक २/०५/२०२५ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.आज दि.२५ मार्च, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

आदेशावरून

क.लिपीक सहा.अधिक्षक

सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

'राष्ट्रवादी'त काम करणाऱ्यांना संधी -आ. चिखलीकर

'साईसुभाष' संपर्क कार्यालयात पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान

नांदेड (प्रतिनिधी)- उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांना कार्यकर्त्यांच्या कामाची जाण आहे. त्यामुळे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसला नंबर एकचा पक्ष करण्याच्या अनुषंगाने सुसाट वेगाने कामाला लागा. पक्षाचे मन लावून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पक्षात चांगली संधी मिळेल, असा विश्वास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला.

आ. चिखलीकर यांच्या 'साई सुभाष' संपर्क कार्यालयात गुरुवारी सकाळी पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी माजी मंत्री तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार अविनाश घाटे, जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, जिल्हाध्यक्ष रावणगावकर, महानगर अध्यक्ष जीवन घोगरे पाटील, प्रदेश सचिव वसंत सुगावे, अशोक मुगावकर, युवा जिल्हाध्यक्ष बालाजी नागणीकर, युवकचे शहराध्यक्ष मोहसीनखान पठाण, दीपक पावडे, तालुका अध्यक्ष गणेश शिंदे पाटील, धम्मपाल धुताडे, सेवादलाचे जिल्हाध्यक्ष रमेश गांजापुरकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

सुनील नानवटे यांना प्रदेश सचिव, संतोष नारलावार यांना उद्योग आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष, सुरेश राठोड यांना ओबीसी विभाग प्रदेश सरचिटणीस, स्वप्नील इंगळे यांना युवक नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष, कन्हैया कदम यांना युवक प्रदेश उपाध्यक्ष, राहुल हंबर्डे यांना युवक प्रदेश सरचिटणीस, तर कल्याण सूर्यवंशी यांची ओबीसी सेल प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

यावेळी आमदार चिखलीकर म्हणाले की, नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसला अधिकाधिक मजबूत करण्यासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत. माजी आमदार मोहन हंबर्डे, अविनाश घाटे, वेंकटराव पाटील गोजेगावकर, डॉ. मीनल खतगावकर, माजी आमदार ओम प्रकाश पोकर्णा यांच्यासह जिल्ह्यातील अनेक दिग्गज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश होतो आहे. भविष्यातही असे पक्षप्रवेश सोहळे होतील, असे आ. चिखलीकर म्हणाले.

पाडव्याच्या मुहूर्तावर राष्ट्रवादीचे सदस्य नोंदणी अभियान

पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्य नोंदणीचा शुभारंभ करण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्यातील कानाकोपऱ्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची ध्येयधोरणे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा अजेंडा पोहोचविला जाईल. या काळात प्रत्येक गावातून वाडी-तांड्यातून सदस्य नोंदणीला प्राधान्य दिले जाईल आणि या सदस्य नोंदणीमध्ये नांदेड जिल्हा हा मराठवाड्यात पहिल्या क्रमांकाचा असेल असा विश्वास आ. चिखलीकर यांनी यावेळी व्यक्त केला.

गिग, प्लॅटफार्म वर्कर व ग्रिगेटर यांनी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करावी -जिल्हाधिकारी

नांदेड (प्रतिनिधी)- केंद्र सरकारने वेगवेगळ्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी करण्यासाठी ई-श्रम पोर्टल सुरु केले आहे. सर्व गिग कामगारांनी १ एप्रिल २०२५ पासून ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करावी. तसेच सर्व ग्रिगेटर यांनी ३१ मार्च २०२५ पर्यंत या register.esharm.gov.in//iser/platform-worker-registration संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

ई-श्रम पोर्टलवर केंद्र शासनाने गिग वर्कर, प्लॅटफॉर्म वर्कर व ग्रिगेटर यांची नोंदणी करण्यास सुरवात केलेली आहे. साधारणत: गिग व प्लॅटफॉर्म वर्कर शेअरिंग वाहन कामगार, अन्न व किराणा पुरवठा करणारे कामगार, लॉजिस्टीक सेवा देणारे कामगार इ. मार्केटमध्ये ऑनलाईन काम करणारे कामगार, प्रोफेशनल सर्विस देणारे कामगार, हेल्थ केअर सेवा देणारे कामगार, ट्रॅव्हल्स व आदरातिथ्य करणारे कामगार, मिडीया सर्विसेस इ. सर्व प्लॅटफार्म गिग वर्करच्या व्याखेत येतात. मेझोन, फ्लीपकार्ट, मिंत्रा, स्नॅपडिल, अजिओ, मिशो, स्विगी, झोमॅटो अशा वेगवेगळया ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर काम करणारे कामगार हे सर्व ई-श्रम esharm.gov.in वर नोंदीत होवू शकतील. केंद्र सरकारकडे डेटा तयार होईल, म्हणून नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

मनमानी करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबीत करा आणि बोगस काम करणाऱ्या गुत्तेदारांना काळ्या यादीत टाका

आ. जितेश अंतापूरकर यांची मागणी

शंकरनगर (प्रतिनिधी) - महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात देगलुर बिलोली मतदारसंघातील रस्त्याच्या कामाची दूरवस्था आणि निकृष्ट दर्जाचे काम यावर आ. जितेश अंतापूरकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर आणि गुत्तेदारांवर गंभीर आरोप करत कठोर कारवाईची मागणी केली.

विधानसभा अधिवेशनाच्या चर्चेत आ. जितेश अंतापूरकर यांनी मतदारसंघातील मुख्यमंत्री ग्राम सडक योजना व प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या निकृष्ठ दर्जाबाबत एक प्रभावी आवाज उठवला आहे.

आ. अंतापूरकर यांनी विधानसभेत मुद्दा उपस्थित करत असे म्हटले की, देगलुर बिलोली मतदारसंघातील रस्त्याच्या कामासाठी लागणारा निधी योग्य पद्धतीने वापरला जात नाही. त्यात नक्कीच भ्रष्टाचार आहे. त्यांनी संबंधित अधिकारी आणि गुत्तेदारांच्या कामावर टीका केली आणि त्या संदर्भात कठोर कारवाई करण्याची गरज व्यक्त केली.

मनमानी करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबीत करा आणि बोगस काम करणाऱ्या गुत्तेदारांना काळ्या यादीत टाका, अशी मागणी त्यांनी विधानसभेत केली.

घनकचरा व्यवस्थापन निविदा प्रक्रियेस मुख्यमंत्र्यांकडून स्थगिती; बाळू खोमणे यांनी केला होता पाठपुरावा

नांदेड (प्रतिनिधी)- येथील महापालिकेकडून दि. १३ डिसेंबर २०२४ ई-टेंडर नोटीस काढून सन २०२४- २५ रोजीचे घन कचरा व्यवस्थापनासाठी काढलेली निवीदा रद्द करुन नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा महापालिकेचे विरोधी पक्षनेते बाळू खोमणे यांनी थेट मुख्यमंत्र्यांकडे केली होती. या निविदा प्रक्रियेस मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिली आहे.

नांदेड- वाघाळा शहर महापालिकेवरील दि. १३ डिसेंबर २०२४ रोजी घन कचरा व्यवस्थापनासाठी निविदा काढली होती. परंतू सदर निवीदेच्या अटी तयार करतांना फक्त मर्जीतील कॉन्ट्रॅक्टरला सोयीच्या ठरतील, असे दिसून आले. निविदेची किंमत १०० कोटींच्या घरात होती आणि अंदाजित खर्च २५० कोटींच्या आसपास जात आहे. वाढलेले १५० कोटी रुपये हे संशोधनाचा विषय आहे. टेंडर घेण्यासाठी इच्छुक असलेल्या विविध २४ ठेकेदारांनी निवीदेतील अटी व शर्ती स्पष्टीकरणाबाबत जवळपास १७६ आक्षेप दाखल केले होते. यातील बहुतांश आक्षेप मनपा प्रशासनाने बेदखल केले. अटी व शर्ती हे फक्त मागील कॉन्ट्रॅक्टरदारास व निवडक कॉन्ट्रॅक्टरदाराच्या सोयीसाठीच केल्याचे दिसत होते. मनपा प्रशासनातफ कॉम्पिटीशन होऊ नये यासाठी अनेक अटी व शर्ती आवश्यक नसतांना समाविष्ट करुन इतर कॉन्ट्रॅक्टरदारास भाग घेऊ शकणार नाहीत अशी तजवीज केलेली दिसते. त्यामुळे सामान्य जनतेच्या करातून मनपाचा उत्पन्न होत असल्याचे वरील निवीदाप्रक्रियेम ध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होण्याची शक्यता होती.

त्यामुळे सदर निवीदे प्रक्रियेसाठी एखादी एक्सपर्ट / तज्ञ कमिटी नेमूण पैशाची बचत होऊन निवीदा अटीमध्ये उचित बदल करुन सामान्य लोकांच्या पैश्याच्या अपव्य व भ्रष्टाचार टाळण्यासाठी सदर निवीदा रद्द करुन नव्याने निवीदा प्रक्रिया करण्यात यावी, अशी मागणी बाळू खोममे यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. मुख्यमंत्र्यांनी १९ मार्च रोजी या पूर्ण घनकचरा व्यवस्थापनाच्या निविदा प्रक्रियेस स्थगिती दिली आहे. यामुळे घनकचरा व्यवस्थापन व विभागात कार्यरत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना मात्र चांगला धक्का बसला आहे.

नांदेड : राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या नांदेड उत्तर जिल्हाध्यक्षपदी स्वप्नील इंगळे यांची निवड करण्यात आली. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते नियुक्तिपत्र देण्यात आले. यावेळी माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर, माजी आ. मोहनराव हंबर्डे, माजी आ. अविनाश घाटे, जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, बाळासाहेब रावणगावकर, जीवन घोगरे पाटील, वसंत सुगावे, कन्हैया कदम, मोहसीन खान पठाण, श्रीधर नागापूरकर, बालाजी शिंदे, माधव चिंचाळे आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

पेट-२०२४ मधुन सूट मिळविण्यासाठी त्रुटींची पूर्तता करण्याचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पेट-२०२४ परीक्षेतून सूट मिळविण्यासाठी ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केले पण त्रुटींची पूर्तता केलेली नाही, अशा विद्यार्थ्यांनी १ एप्रिल पर्यंत त्रुटीची पुरता करावी, असे आवाहन पदव्युत्तर विभागाचे उपकुलसचिव मेघश्याम साळुंके यांनी केले आहे.

पेट-२०२४ साठी केलेल्या अर्जाची छाननी विद्यापीठाकडून करण्यात आलेली आहे. या परीक्षेतून सुट मिळण्यासाठी जे उमेदवार पात्र आहेत, अशा उमेदवारांना ग्रांटेड व ज्या उमेदवारांनी अर्जासोबत काही कागदपत्र सादर केलेले नाहीत अशा उमेदवारांचे अर्ज नॉटग्रँटेड असे करण्यात आले आहे. ज्या उमेदवारांनी अर्जाची हार्ड कॉपी व कागदपत्र विद्यापीठाकडे सादर केले नाहीत अशा उमेदवारांचे अर्ज रद्द करण्यात आलेले आहेत.

नांदेड आगाराला मिळाल्या पाच नवीन बसेस

आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या मागणीला यश

नांदेड (प्रतिनिधी)- येथील नांदेड आगारासाठी राज्याचे परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांना आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यानंतर मंत्री सरनाईक यांनी नांदेड डेपोसाठी पाच नवीन बसेस दिल्या आहेत.

या नवीन पाच बसेसचे उद्घाटन मंगळवारी नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर व नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, राज्य परिवहन विभागीय नियंत्रक वडजकर, आगार प्रमुख अनिकेत बल्लाळ, तालुकाप्रमुख उद्धव पाटील शिंदे, तालुकाप्रमुख ॲड. मारोती पंढरे, बालाजी पाटील भायेगावकर, शिवराज बोंढारे, तुकाराम पवार, संभाजी जाधव, नामदेव पुयड यांच्यासह आदी एसटी महामंडळाचे अधिकारी-कर्मचारी, शिवसेना एसटी कामगार सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते होते.

नव्या पिढीसाठी भाषेची अस्मिता जागवली पाहिजे -विजय कुवळेकर

नांदेड (प्रतिनिधी)- आपण स्वराष्ट्राचा अभिमान बाळगतो, त्यासोबतच स्वभाषेचाही अभिमान बाळगला पाहिजे. नव्या पिढीसाठी भाषेची अस्मिता जागवली पाहिजे, असे मत ज्येष्ठ पत्रकार आणि प्रख्यात साहित्यिक विजय कुवळेकर यांनी व्यक्त केले.

नांदेड येथील प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानच्या वतीने शनिवारी (२२ मार्च) नियोजन भवन येथे आयोजित वाङमय पुरस्कार प्रदान सोहळ्यात मातुश्री पद्मिनीबाई बन साधना सन्मानाचे मानकरी श्री. विजय कुवळेकर हे बोलत होते.

विचारपीठावर ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ व लेखक डॉ. नंदकुमार मुलमुले यांच्यासह पुरस्कारांचे मानकरी अशोकराव कोठावळे, देवा झिंजाड, डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. अनंत कडेठाणकर, छाया बेले, प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अच्युत बन, पुरस्कार समितीचे निमंत्रक डॉ. सुरेश सावंत आणि ज्येष्ठ पत्रकार संजीव कुळकर्णी आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

विजय कुवळेकर पुढे म्हणाले, की माणसं खूप शिकली, पण संस्कारित झाली नाहीत. लोकांची महत्त्वाकांक्षा फारच वाढली, परिणामी माणूस आत्मकेंद्रित झाला. सध्या संवेदनशीलता आणि विश्वासार्हतेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. दिवसेंदिवस प्रसारमाध्यमांच्या विश्वासार्हतेची घसरण होत असल्याचे सांगून त्यांनी विश्वासार्हता हेच खरे भांडवल आहे, परंतु सध्या विश्वासार्हताच दिसत नसल्याची खंत व्यक्त केली.

२४ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या प्रसाद प्रतिष्ठानच्या पुरस्कारांच्या बीजारोपणापासूनचा मी साक्षीदार आहे. कोणताही उपक्रम अखंडपणे चालू ठेवणे ही साधी-सोपी बाब नाही. इतरांना सुख आणि आनंद देणे हे या उपक्रमातून दिसते. ठरविलेले ध्येय गाठताना जीवनाची फरफट होते. ताण-तणाव वाढतो. जीवन असह्य होते. उद्दिष्टाकडे वाटचाल करणारा प्रवास आनंद देत नसेल, तर ते उद्दिष्ट कामाचे नाही. पुरस्कार हे निमित्त आहे. साहित्यिकांचे अनुभव आपल्यापर्यंत पोहोंचविण्याची संधी प्रसाद प्रतिष्ठानने मिळवून दिली आहे, असे मनोगत डॉ. नंदकुमार मुलमुले यांनी व्यक्त केले.

यावेळी पुरस्कारप्राप्त साहित्यिकांनी आपले अनुभवकथन करून प्रसाद प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे कौतुक केले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अच्युत बन यांनी या सोहळ्यामागची भूमिका विशद केली. पुढील वर्ष हे पुरस्कारांचे रौप्यमहोत्सवी वर्ष असल्याचे त्यांनी सांगितले.

पुरस्कारांचे मानकरी

डॉ.नंदकुमार मुलमुले यांच्या हस्ते विजय कुवळेकर यांना मातुश्री पद्मिनीबाई बन साधना सन्मान आणि अशोकराव कोठावळे यांना 'दीपावली' दिवाळी अंकासाठी प्रसाद बन राज्यस्तरीय उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार प्रदान करण्यात आला. देवा झिंजाड यांच्या 'एक भाकर तीन चुली' या कादंबरीला प्रसाद बन वायय पुरस्कार, डॉ. श्रीकांत पाटील यांच्या 'बहुरंगी बहुढंगी नाट्यछटा' या निर्मितीला राज्यस्तरीय बालसाहित्य पुरस्कार, डॉ. अनंत कडेठाणकर यांच्या 'लाईफ जॅकेट' या कथासंग्रहाला प्रसाद बन राज्यस्तरीय ग्रंथगौरव पुरस्कार आणि छाया बेले यांच्या 'हॅप्पी होमच्या भिंतीआड' या कवितासंग्रहाला स्थानिक ग्रंथगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. मान्यवरांचा अल्पपरिचय देत डॉ. सुरेश सावंत यांनी सुरेख सूत्रसंचालन केले. प्रतिष्ठानच्या सचिव डॉ. वर्षा बन यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास साहित्यिक आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

बॅनरवरून मोटारसायकल...

सहायक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांनी कारवाई करत यातील अहेमद शेख, जुनैद बागवान, फुरखान पठाण, लुकमान पठाण, रहेमान शेख व इतर एका अल्पवयीन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी तातडीने तपास मोहीम राबवून सपोनि श्रीधर जगताप यांनी या घटनेतील पाच आरोपीना जेरबंद केले असून अहमद शेख हा फरार आहे. अटकेतील पाच जणांना न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी दिल्याची माहिती सपोनि श्रीधर जगताप यांनी दिली आहे.

रामतीर्थ पोलिसांनी सतर्कता दाखवत वेळीच कठोर पावले उचलल्याने या घटनेतील आरोपी गजाआड झाले असून सपोनि श्रीधर जगताप यांनी समय सूचकता राखून केलेल्या कारवाईमुळे संवेदनशील नरसीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यास मोलाची मदत झाल्याची चर्चा जनतेत होत आहे.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com